महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक
समर्थ गांवकरी
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026
रविवार, दि. १९ ऑक्टोबर २०२५
मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक
संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ३ रे | अंक : ३३९ | किंमत : ४.०० रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com

## आता बोला...




## थोडक्यात...



### नीलेश घायवळच्या घरात 'ॲम्युनिशन बॉक्स'

पुणे (समर्थ गांवकरी) : कोथरुड गोळीबार प्रकरणातील आरोपी गुंड नीलेश घायवळ याच्या कोथरुडमधील घराच्या झडतीत काडतुसे, तसेच पुंगळ्यांसह काडतुसे ठेवण्याचे लाकडी खोके (ॲम्युनिशन बॉक्स) सापडले आहे. खडकीतील लष्कराच्या दारुगोळा कारखान्यातील हे खोके घायवळपर्यंत कसे पोहोचले? याद्दष्टीने पोलिसांकडून तपास सुरु करण्यात आला आहे. याबाबत पोलिसांकडून दारुगोळा कारखान्यातील अधिकाऱ्यांशी पत्रव्यवहार करण्यात आला आहे. या प्रकरणी कोथरुड पोलीस ठाण्यात घायवळ याच्याविरुद्ध आणखी एक गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घायवळ याच्याविरुद्ध आता सात गुन्हे दाखल झाले आहेत. तो सध्या युरोपात असून, त्याच्या प्रत्यार्पणासाठी पोलिसांकडून आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी पोलीस संस्थेशी संपर्क साधण्यात आला आहे. घायवळला पकडण्यासाठी 'ब्ल्यू कॉर्नर' नोटीस बजाविण्यात आली आहे.

### पुणे- बंगळुरू महामार्गावर वाहतूककोंडी

कराड (समर्थ गांवकरी) : पुणे-बंगळुरू महामार्गावर कोल्हापूर नाका येथे वायु नलिकेसाठी उकरलेल्या खड्ड्यांमुळे, तसेच कोल्हापूर नाका ते वारुंजी फाटा व कोल्हापूर नाका दरम्यान, दुतर्फा मोठी वाहतूक कोंडी झाल्याने वाहनांच्या कित्येक किलोमीटर लांबच लांब रांगा लागल्या, तर कराडमध्ये जागा मिळेल तिथे छोट्या व्यावसायिकांनी दुकाने थाटल्याने बघेल तिकडे वाहतूक जाम आणि गर्दीचा माहोल दिसत होता. त्यामुळे दिवाळीच्या खरेदीसाठी बाहेर पडलेल्यांना तासन् तास वाहतूककोंडीत अडकून पडावे लागले. पुणे-बंगळुरु महामार्गाच्या सहा पदरीकरणाचे काम सुरु असल्याने अनेक ठिकाणी तीव्र वळणे आणि चिंचोळे बनलेले रस्ते, उकरलेले रस्ते, वाहन बंद पडणे अशा प्रकारांमुळे वाहतूक ठप्प होणे, संथ गतीने चालल्याने वाहतूक कोंडीचा वाहनधारक, चालक, प्रवासी आणि स्थानिकांचे प्रचंड हाल होत आहेत. दिवाळी सण असल्यामुळे मोठ्या प्रमाणावर महामार्गावर वाहनांची संख्या होती, अशातच वाहनचालकांनी जागा मिळेल तिथून वाहन बाहेर रेटण्याचा प्रयत्न केल्याने वाहतुकीची कोंडी अधिकच वाढली. सहापदरीकरणाच्या कामामुळे दोन्ही बाजूची वाहतूक उपमार्गावरुन वळवण्यात आली आहे.

# नगरमध्ये रुग्णाच्या मृत्यूस कारणीभूत 6 डॉक्टर अडचणीत

### उच्च न्यायालयाच्या दणक्यानंतर गुन्हा दाखल!

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

करोना संसर्ग झालेला नसतानाही तो झाल्याचा बनाव करत वयोवृद्ध रुग्णास करोनाबाधित रुग्णांसोबत मर्जीविरूद्ध दाखल केले. त्यांच्यावर अति तीव्र स्वरुपाचे, जीवितास धोका निर्माण होईल असे औषधोपचार करून मृत्यूस कारणीभूत झाल्याचा तसेच औषधोपचाराची अवाजवी देयके आकारून फसवणूक केली, अवयवांची तस्करी केली व पुरावे नष्ट करण्याच्या उद्देशाने मृतदेहाची परस्पर विल्हेवाट लावल्याच्या आरोपावरून शहरातील विविध रुग्णालयांच्या ६ डॉक्टरांविरूद्ध तोफखाना पोलीसांनी गुन्हा दाखल केला आहे. गुन्हा दाखल झालेल्या सहाही डॉक्टरांचा शोध घेतला जात असल्याची माहिती तपासी अधिकारी तथा तोफखाना पोलीस ठाण्याचे निरीक्षक आनंद कोकरे यांनी दिली. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तपासात आरोपींच्या संख्येत वाढ होण्याची शक्यता व्यक्त केली जाते. सहा जणांमध्ये दोघे खासगी रुग्णालय चालवणारे, दोघे कोविड सेंटर चालवणारे, एक जण पॅथॉलॉजिस्ट तर आणखी एक जण एका प्रतिष्ठानच्या रुग्णालयातील प्रयोगशाळा तंत्रज्ञ आहे. याशिवाय इतर कर्मचाऱ्यांविरूद्धही कट करत तालुका फसवणूक व मृत्यूस कारणीभूत झाल्याचा आरोप आहे.

यासंदर्भात अशोक बबनराव खोकराळे (वय ४७, रा. सावेडी) यांनी फिर्याद दिली आहे. त्यांनीच उच्च न्यायालयात या घटनेसंदर्भात दाद मागितली होती. त्यांचे ७९ वर्षीय वडील बबनराव नारायणराव खोकराळे यांचा या घटनेत मृत्यू झाला. ऑगस्ट २०२० दरम्यानची घटना आहे.



संशयित आरोपी डॉक्टरांनी सावेडी उपनगरातील मनमाड रस्त्यावरील पटियाला हाऊस येथे तात्पुरते करोना उपचार केंद्र सुरू केले होते. वडिलांना घशाची खवखव व बद्धकोष्ठतेचा त्रास होत होता. त्याच्या उपचारासाठी संबंधित डॉक्टरांनी त्यांना पटियाला हाऊस येतील कोविड सेंटरमध्ये दाखल केले.

करोना निदान तपासणी अहवाल साधारण असूनही त्यांना निरीक्षणाखाली ठेवले तसेच फिर्यादी यांना न कळवताच परस्पर खासगी रुग्णालयात हलवण्यात आले. खासगी रुग्णालयातून वडिलांनी मुलांना फोन करून 'डॉक्टर मला बेडला बांधून ठेवतात, खूप रक्त काढले, मला इथून घेऊन जा,' अशी विनवणी केली होती.

अशोक खोकराळे यांनी भेटण्याचा प्रयत्न केला असता त्यांना अडवण्यात आले व डॉक्टरांनी 'रुग्ण नॉर्मल आहे' असे सांगितले. मात्र नंतर ते करोनाबाधित असल्याचे सांगून डिस्चार्ज देण्यास टाळाटाळ केली. त्यानंतर १८ ऑगस्ट २०२० रोजी अशोक खोखराळे यांना वडीलांच्या मृत्यूची बातमी मिळाली. रुग्णालयाने १ लाख ८४ हजार रुपयांचे देयक भरण्यास सांगीतले. देयक अदा केल्यानंतर मृतदेह जिल्हा सरकारी रुग्णालयात पाठवल्याचे सांगीतले. मात्र अशोक खोकराळे यांनी शोधाशोध करूनही वडीलांचा मृतदेह आजपर्यंत सापडला नाही,

## शेतकऱ्यांची फसवणूक केल्याने काळी दिवाळी : शिंदे

**सातारा : (समर्थ गांवकरी)**

शासनाने शेतकऱ्यांची फसवणूक केली आहे. त्यामुळे आमच्या पक्षाच्या वतीने शासनाचा निषेध म्हणून राज्यभर काळी दिवाळी साजरी करण्यात येत असल्याचे राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी साताऱ्यात सांगीतले. महायुती सरकारने बळीराजाच्या डोळ्यात धूळफेक करून शेतकऱ्यांनाही फसवी मदत दिली आहे. त्याचा निषेध म्हणून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर शुक्रवारी (दि १७) निषेधात्मक काळी दिवाळी, लाक्षणिक उपोषण करण्यात आले. या वेळी शशिकांत शिंदे पत्रकारांशी बोलत होते. या वेळी माजी मंत्री बाळासाहेब पाटील, जिल्हाध्यक्ष सुनील माने आदी उपस्थित होते. महाराष्ट्रामध्ये मे महिन्यापासून ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यापर्यंत जोरदार अतिवृष्टी झाली आहे. त्यामुळे सर्वत्र बळीराजा अडचणीत आहे. ज्यांच्या जमिनी खरडून आणि वाहून गेल्या आहेत, त्यांच्यासाठी जाहीर केलेले पॅकेज ही फसवणूक आहे. एकूणच शासनाने राज्यातील शेतकऱ्यांची फसवणूक केली आहे. यासाठी आम्ही लाक्षणिक उपोषण केले आहे. राज्यभर आम्ही काळी दिवाळी साजरी करत आहोत, असे शिंदे यांनी सांगितले. विरोधी पक्षाच्या पाठपुराव्यामुळे सरकारने घाईघाईत फसवी मदत जाहीर केली. परंतु सरसकट शेतकऱ्यांची कर्जमाफी करणे गरजेचे असताना केवळ विविध निकष लावून शेतकऱ्यांच्या पदरात काहीच मदत पडत नसल्याच्या घटना समोर येत आहेत.

## राज ठाकरे अजित पवारांच्या पायाची धूळ : सदावर्तेंनी डिवचलं

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

राज ठाकरे हा राजकारणातील नापास माणूस आहेत असं म्हणत ॲड. गुणरत्न सदावर्ते यांनी राज ठाकरेंना डिवचलं आहे. परिक्षेत बढती पास करण्यासाठी 30 मार्कावर पाच मार्क देऊन पास केलं जातं, तसं दोघांचं आहे. अजित पवार यांच्या राजकीय वजनाच्या पायाच्या धुळीप्रमाणे राज ठाकरे आहेत. किती वेळा अजित पवार उपमुख्यमंत्री राहिले आहेत, तर राज ठाकरे काय आहेत? असा सवाल त्यांनी केला. तसेच मिमिक्री करुन मतं मिळत नाहीत असे म्हणत सदावर्तेंनी राज ठाकरेंवर टीका केली.



एकनाथ शिंदे आणि आमचा एकच डीएनए आहे. पंडीत नथुराम गोडसे यांच्या विचारांसाठी आनंद दिघे कोर्टात लढले होते असे गुणरत्न सदावर्ते म्हणाले. म्हणून आनंद दिघे, एकनाथ शिंदे आणि आमचा डीएनए एकच आहे असे सदावर्ते म्हणाले. पंडीत नथुराम गोडसे यांच्या विचारांसाठी आनंद दिघे लढले होते, म्हणून आनंद दिघे यांच्या विचारांचे एकनाथ शिंदे आणि मी आहे असे सदावर्ते म्हणाले.

दिवाळीनंतर राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे फटाके फुटणार आहेत. मात्र, तत्पूर्वी विरोधी पक्षातील प्रमुख नेत्यांनी निवडणूक आयोगाकडे जाऊन मतदार यादीतील घोळाबाबत अनेक तक्रारी केल्या आहेत. त्यावेळी, मनसेप्रमुख राज ठाकरे यांनी आयोगाला कडक प्रश्न विचारले. तर, उपमुख्यमंत्री अजित पवार यांची मिमिक्री करत त्यांना टोलाही लगावला. दरम्यान, आता ॲड. गुणरत्न सदावर्ते यांनी राज ठाकरेंच्या मिमिक्रीवरुन त्यांच्यावर टीका केलीय. तसेच, सदावर्ते यांनी पुन्हा एकदा वादग्रस्त वक्तव्य केलं असून थेट नथुराम गोडसे यांच्या विचारांशी आपला डीएनए असल्याचं म्हटलं आहे. गेल्या काही दिवसांपासून गुणरत्न सदावर्ते हे राज ठाकरे यांच्यावर टीका करताना दिसून येत आहेत.

## जाहिराती नाहीत तर बातम्या नाहीत : संपादकांचा इशारा

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

राज्यातील वृत्तपत्रांना शासकीय तसेच खासगी जाहिरातींचा पुरवठा मोठ्या प्रमाणात कमी झाल्याने आर्थिक संकट गडद होत आहे. या पार्श्वभूमीवर राज्यातील विविध पत्रकार संघटना, संपादक मंडळे आणि वृत्तसंस्था मालकांनी एकत्र येत सरकार आणि जाहिरात विभागाला ठोस इशारा दिला आहे — "जाहिराती नाहीत तर बातम्या नाहीत!"



**संघटनांनी मागणी केली आहे की**

* राज्य सरकारने पारदर्शक जाहिरात धोरण लागू करावे.
* ग्रामीण आणि लघु वृत्तपत्रांना नियमित जाहिरातींचे प्रमाण सुनिश्चित करावे.
* शासकीय जाहिरात बजेटमध्ये माध्यमांच्या आकारानुसार न्याय्य वाटप व्हावे.
* वृत्तपत्र उद्योगाला 'आवश्यक सेवा' म्हणून घोषित करून त्यासाठी आर्थिक साहाय्य द्यावे.

गेल्या काही महिन्यांपासून शासकीय जाहिरातींचे वाटप असमान आणि पक्षपाती पद्धतीने होत असल्याचे अनेक संपादकांनी निदर्शनास आणले आहे. ग्रामीण व लघु वृत्तपत्रांना तर जाहिरातींचा ओघ जवळपास थांबला आहे. त्यामुळे अनेक स्थानिक दैनिके आणि साप्ताहिके आर्थिक अडचणीत सापडली आहेत.

पत्रकार संघटनांच्या प्रतिनिधींनी सांगितले की, "पत्रकारिता ही केवळ बातम्या देण्याची प्रक्रिया नाही, तर ती लोकशाहीचा चौथा स्तंभ आहे. पण जर जाहिरातींचा पुरवठा रोखून हा स्तंभच कमजोर केला जात असेल, तर बातम्या देणे शक्य होणार नाही. म्हणूनच आम्ही स्पष्ट सांगतो — जाहिराती मिळाल्या नाहीत, तर बातम्या थांबतील."

राज्य पत्रकार संघ, संपादक परिषद आणि मराठी वृत्तपत्र मालक संघ यांनी एकत्रितपणे याबाबत तातडीची बैठक घेतली. या बैठकीत जाहिरात धोरणातील त्रुटी, वितरणातील अन्याय आणि डिजिटल माध्यमांच्या वर्चस्वामुळे छापील माध्यमांवर येणारा परिणाम यावर सविस्तर चर्चा झाली.

या आंदोलनाला समर्थन देताना काही ज्येष्ठ संपादकांनी मत व्यक्त केले की, "माध्यमांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी करण्यासाठी सरकारकडून जाहिरातींचा पुरवठा हा केवळ मदत नाही, तर लोकशाही टिकवण्याचे साधन आहे. सरकार आणि समाजाने हे समजून घ्यायला हवे."

## अकोल्यात देवठाणमध्ये चार दिवसांत ३ बिबटे जेरबंद

**अकोले : (समर्थ गांवकरी)**

तालुक्यातील देवठाणमध्ये चार दिवसांत तीन बिबटे पकडण्यात आले. मात्र या परिसरात आणखी बिबटे असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. सर्व बिबटे पकडण्याची गावकऱ्यांची मागणी आहे. काही दिवसांपूर्वीच देवठाणमध्ये बिबट्याच्या हल्ल्यात एका बालिकेसह महिलेचा मृत्यू झाला होता. दरम्यान वनखात्याच्या निषेधार्थ देवठाणमध्ये रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. वनखात्याने बिबट्यांचा बंदोबस्त न केल्यास आम्ही त्यांचा बंदोबस्त करू, असा इशारा यावेळी देण्यात आला. कविता गांगड या तीन वर्षीय बालिकेचा बिबट्याच्या हल्ल्यात मृत्यू झाला. घराच्या अंगणात खेळत असणाऱ्या या मुलीला बिबट्याने उचलून नेले. चार महिन्यांपूर्वी बिबट्याच्या हल्ल्यात जखमी झालेल्या एका महिलेचा उपचार सुरू असताना मृत्यू झाला होता.

अनेक दिवसांपासून देवठाण परिसरात बिबट्यांचा उपद्रव सुरू आहे. त्यामुळे बालिकेच्या मृत्यूनंतर गावकऱ्यांमध्ये वनखात्याविरोधात मोठा रोष निर्माण झाला. रास्ता रोको आंदोलन करून लोकांनी आपला संताप व्यक्त केला. पकडलेले बिबटे जवळपासच सोडले जातात. त्यामुळे बिबट्यांची संख्या वाढली आहे, असा गावकऱ्यांचा आरोप आहे.

## साईबाबा संस्थानमध्ये 77 लाखांचा गैरव्यवहार, 47 अधिकारी-कर्मचाऱ्यांवर गुन्हा

**राहाता : (समर्थ गांवकरी)**

शिर्डी येथील साईबाबा संस्थानच्या विद्युत विभागात ७७ लाख रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला असून, विद्युत विभागाच्या अधिकाऱ्यांसह ४७ कर्मचाऱ्यांवर न्यायालयाच्या आदेशाने शिर्डी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




कोपरगावमधील सामाजिक कार्यकर्ते भास्करराव संजय काळे यांनी यासंदर्भात फिर्याद दिली आहे. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. साईबाबा संस्थानकडे तक्रार करूनही दखल न घेतल्याने संजय काळे यांनी उच्च न्यायालयात धाव घेतली होती. काल शुक्रवारी रात्री त्यांनी शिर्डी पोलिसांकडे फिर्याद दिली.

त्यांनी फिर्यादीत म्हटले आहे की, श्री साईबाबा संस्थानच्या विद्युत विभागात संस्थान कर्मचारी म्हणून कार्यरत असताना त्यांच्या अखत्यारीत व जबाबदारीमध्ये असलेल्या विद्युत साहित्यांची डेडस्टॉक रजिस्टरप्रमाणे नोंदणी न ठेवता विद्युत साहित्याची चोरी केली व डेडस्टॉक रजिस्टरमध्ये बनावट नोंदी केल्या. ज्यावेळी गैरव्यवहार उघडकीस आला, त्यावेळी अतिरिक्त विद्युत साहित्य या ठिकाणी जमा केले आहे. याबाबत लेखापरीक्षण केल्यानंतर असे दिसून आले आहे की, वरील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी मिळून ७७ लाख १३ हजार रुपयांची वीज साहित्याची चोरी करून त्याचा अपहार केला आहे.

त्यात सर्व ४७ आरोपींवर स्वतंत्रपणे चोरीच्या साहित्याच्या रकमेची जबाबदारी निश्चिती केली आहे. त्यापैकी ३९ आरोपींनी त्यांच्यावर निश्चित केलेल्या जबाबदारीची रक्कम संस्थांनमध्ये भरणा केली आहे. तर उर्वरीत ८ आरोपींनी त्यांच्यावर निश्चित केलेल्या जबाबदारीची रक्कम भरणा केली नाही. अशा प्रकारे सर्व ४७ जणांनी कट करून विद्युत साहित्य चोरी व गैरव्यवहार केलेला आहे, असे संजय काळे यांनी फिर्यादीत नमूद केले आहे.

सामाजिक कार्यकर्ते संजय काळे यांनी उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात याचिका दाखल केली होती व त्यात उच्च न्यायालयाने दि. १५ ऑक्टोबर रोजी त्यांना पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यास आदेशीत केले होते.

त्यानुसार काल, शुक्रवारी रात्री शिर्डी पोलीस ठाण्यात साईबाबा संस्थानच्या ४७ कर्मचारी व अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

साईबाबा संस्थानचे प्रशासन ४७ जणांवर काय कारवाई करणार याकडे भाविकांचे लक्ष लागले आहे. या प्रकाराने शिर्डीसह साई संस्थान वर्तुळात खळबळ उडाली आहे.

संजय काळे यांच्या पाठपुराव्यातून हा घोटाळा उजेडात आला. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार शिर्डी पोलिसांनी याप्रकरणी फिर्याद दाखल करून घेतली आहे.

पोलीस तपासात आणखी कोणती माहिती समोर येते, याकडे साईभक्तांचे लक्ष राहील.

# 'ऑपरेशन ब्लू स्टार' ही चूकच होती

'जून १९८४ मध्ये सुवर्णमंदिरात करण्यात आलेले 'ब्लू स्टार ऑपरेशन' ही चूक होती आणि ज्यासाठी इंदिरा गांधी यांना आपल्या प्राणाची किंमत द्यावी लागली' असे उद्गार काँग्रेसचे वरिष्ठ नेते पी. चिदंबरम् यांनी एका पुस्तकाच्या प्रकाशन समारंभप्रसंगी काढले आणि पुन्हा एकदा या विषयाला तोंड फुटले. तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी पंजाबमधील अकाली आंदोलन ज्या पद्धतीने हाताळले, त्यावर अनेक लेख, पुस्तके लिहिली गेली आहेत आणि भविष्यातही लिहिली जातील. जून १९८४ मधील शिखांच्या सर्वोच्च पवित्र ठिकाणी म्हणजे सुवर्ण मंदिरात झालेली लष्करी कारवाई हा या कारवाईचा अंतिम बिंदू होता. या कारवाईला 'ऑपरेशन ब्लू स्टार' असे संबोधण्यात आले होते.

इंदिरा गांधींनी हे आंदोलन ज्या पद्धतीने हाताळले, त्यावर बहुतेक लेख आणि पुस्तकांमध्ये टीकाच करण्यात आली आहे. लष्कराला पाचारण करण्यात इंदिराजींनी खूप घाई केली, असे काही जणांचे म्हणणे होते. त्यांच्या मते या समस्येवर इंदिराजींनी चर्चेद्वारे तोडगा काढायला हवा होता. 'जून १९८४ पूर्वीच असा निर्णय का घेतला नाही?'- म्हणून काही जणांनी टीकाही केलेली आहे. आधी हा निर्णय घेतला असता तर सुवर्ण मंदिरात लपून बसलेल्या अतिरेक्यांना बाहेर काढण्याचे काम पोलिसही करू शकले असते, लष्कराच्या सहभागाची गरजच पडली नसती, असेही अनेकांचे मत



## संपादकीय

दिसते. ही मते-मतांतरे आजवर अनेकदा लिहिली, व्यक्त केली गेली आहेत. १९८८ मध्ये पोलिसांच्याद्वारे 'ऑपरेशन ब्लॅक थंडर' यशस्वीपणे राबविणारे वरिष्ठ पोलिस अधिकारी एस. एस. विर्क, स्व. इंदिरा गांधी यांचे तत्कालीन प्रधान सचिव पी. सी. अलेक्झांडर आणि मेजर जनरल रणजितसिंग दयाल या सर्वांशी माझ्या वेळोवेळी विस्तृत चर्चा झाल्या. त्यात 'ऑपरेशन ब्लू स्टार' ही चूकच होती,' याची कबुली जवळपास सर्वांनीच दिली; पण 'ती चूक इंदिरा गांधी यांची होती का?'- यावर पी.सी अलेक्झांडर यांचे म्हणणे मला सत्याच्या जास्त जवळ जाणारे वाटते. ते म्हणतात, 'या घटनेशी निगडित पडद्याआडच्या चर्चा, निर्णयप्रक्रिया आणि धोरणे ठरविण्याची प्रक्रिया



यांच्याशी मी संबंधित असल्याने या प्रकरणाबाबत जास्त विश्वासार्ह माहिती कदाचित माझ्याकडे आहे.

इंदिरा गांधी यांच्यासमोर गुप्तचर, तसेच विविध यंत्रणांकडून आलेली माहिती आणि लष्करी अधिकाऱ्यांची मते यामुळे दुसरा पर्याय नाही, असे वाटल्याने हा निर्णय घेण्यात आला.' पी. सी. अलेक्झांडर यांनी याबाबत विस्ताराने त्यांच्या 'कॉरिडॉर्स ऑफ पॉवर्स' या आत्मचरित्रात लिहिले आहे. त्यात ते लिहितात, 'पंजाबची परिस्थिती हळूहळू खराब होऊ लागली आणि त्याला हिंदू विरुद्ध शीख असे धर्मयुद्धाचे स्वरूप येऊ लागले.

त्यामुळे इंदिरा गांधी अत्यंत निराश झाल्या होत्या. अकाली आंदोलन हिंसक होऊ लागले, तेव्हा त्या इतक्या निराश होत्या की, त्यांनी वर्ष १९८२ च्या मे महिन्यातील शेवटच्या आठवड्यात पंतप्रधानपदाचा राजीनामा देण्याचा मनोदय माझ्याकडे व्यक्त केला होता. आपण पंतप्रधानपदापासून दूर झालो, तर ते देशाच्या आणि त्यांच्या दृष्टीने योग्य ठरेल, असे त्यांना वाटत होते.' पंजाब आणि हरियाणा यांच्यामधील राजधानीचा प्रश्न असेल किंवा पाण्याचा; तो शांततेने सुटला पाहिजे, अशी इंदिरा गांधींची प्रामाणिक इच्छा होती. मात्र, विदेशातून पंजाबमधील अस्थिरतेला आणि दहशतवादाला ज्याप्रकारे प्रोत्साहन दिले जात होते त्यामुळे त्यांना काळजी वाटत होती. भिंद्रनवाले सुवर्ण मंदिरात ठाण मांडून बसल्यावर दिल्ली ते पंजाब या भागात हल्ले, हत्या, जाळपोळ आणि हिंसाचार वाढू लागल्या.

## दै. समर्थ गांवकरी सूडोकू क्र. १६

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 8 | | 9 | | 7 | | 2 | |
| 3 | 7 | | | | | 4 | | |
| 4 | | 9 | 2 | | 8 | | 1 | 5 |
| | | 3 | 1 | 5 | 9 | | | |
| | 5 | | | | | | 4 | |
| | | | 4 | 8 | 2 | 1 | | |
| 8 | 2 | | 7 | | 3 | 6 | | 4 |
| | | 6 | | | | | 7 | 1 |
| | 1 | | 6 | | 5 | | 3 | |

उत्तर उद्याच्या अंकात

**खेळाचे नियम :** प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोड्याचे केवळ एकच उत्तर आहे.या कोड्याला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

### सूडोकू क्र. १५ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 6 | 3 | 9 | 7 | 8 | 4 | 2 | 5 |
| 8 | 5 | 9 | 2 | 3 | 4 | 6 | 7 | 1 |
| 7 | 4 | 2 | 1 | 5 | 6 | 8 | 3 | 9 |
| 2 | 8 | 1 | 3 | 4 | 5 | 7 | 9 | 6 |
| 5 | 9 | 6 | 8 | 1 | 7 | 3 | 4 | 2 |
| 4 | 3 | 7 | 6 | 9 | 2 | 1 | 5 | 8 |
| 3 | 2 | 8 | 7 | 6 | 9 | 5 | 1 | 4 |
| 9 | 1 | 5 | 4 | 8 | 3 | 2 | 6 | 7 |
| 6 | 7 | 4 | 5 | 2 | 1 | 9 | 8 | 3 |

| | | |
|---|---|---|
| १९ ऑक्टोबर २०२५ | विश्वावसूनाम | १३:५१:५६ |
| रविवार | अयन- दक्षिणायान | नक्षत्र:उत्तराफाल्गुनी |
| विक्रम संवत्- २०८१ | मास- अश्विन | १७:४९:३१ |
| अश्विन शके | ऋतु- सौरसौर शरद | योग:ऐन्द्र |
| संवत्- १९४७ | कृष्ण पक्ष | २६:०४:०५+ |
| संवत्सर - | तिथि:त्रयोदशी | करण:वणिज |

## उपदेशाचे डोस

### राग

एका उद्योगपती माणसाने एक लहानशी बाग केली होती व तिच्याभोवती भिंत घालून आत जाण्यास फक्त एकच दार ठेवले होते. ते दार लोखंडी गजाचे असून ते वाटेल तेव्हा खाली सोडता यावे अशी व्यवस्था केली होती. बागेच्या आसपास बरेच लांडगे होते. एके दिवशी एक लांडगा बागेत शिरला असता बागेतील नोकराने त्याला खड्ड्यात पाडून युक्तीने पकडले व झाडाला बांधून ठेवले होते. इतके केल्यावर पुढे काय मजा होते ती पाहण्यासाठी तो थोडावेळ दुसऱ्या झाडाखली जाऊन बसला काही वेळाने तो लांडगा गुरगुरू लागला व त्यामुळे आसपासच्या लांडग्यांचा मोठा कळप येऊन त्या बागेत शिरला. सगळे लांडगे आत आलेत असे पाहताच नोकराने ते लोखंडी दार वरून खाली सोडले. त्याचा आवाज ऐकताच सर्व लांडगे बाहेर पडण्यासाठी दाराजवळ येऊन धडपड करू लागले. परंतु दार अगदी पक्के असल्याने काहीच उपयोग होईना. मग रागाने ते सगळेजण पहिल्या लांडग्याकडे गेले व एका क्षणात त्याला सर्वांनी मिळून मारून टाकले.

कथा उपदेश : आपणास संकटात पाडण्यास कारण झालेला जरी कोणी आपल्या जातीचा असला तरी कोणासही त्याचा राग आल्याशिवाय राहणार नाही.

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १७८१ – लॉर्ड कॉर्नवॉलिसनी शरणगतीच्या कागदपत्रांवर स्वाक्षऱ्या केल्या व अमेरिका हे अधिकृतरित्या स्वतंत्र असल्याचे राजाच्या वतीने कबूल केले.
- १८०७ – सर हंफ्रे डेव्हींनी सोडियम धातूचा शोध जाहीर केला.
- १८१२ – नेपोलियनच्या सैन्याने मॉस्कोहून माघार घ्यायला सुरुवात केली.
- १८७९ – थॉमस अल्वा एडिसनने टंग्स्टन धातूची तार वापरून पहिला विजेचा दिवा प्रज्वलित केला.
- १९४३ – स्वीडनच्या भूमीवर ४२०० ब्रिटिश कैद्यांना तेवढ्याच जर्मन कैद्यांच्या बदल्यात जर्मनीने सोडले. अशा तऱ्हेची ही कैद्यांची पहिलीच अदलाबदल होती.

### राष्ट्रीय

- १८८९ – दिग्बोई येथे भारतातील खनिज तेल देणारी पहिली विहीर खोदण्यात आली.
- १९७० – भारतात निर्मिती झालेले पहिले 'मिग-२१' विमान भारतीय हवाईदलात सामील.


### जन्म

- १९०२ – दिवाकर कृष्ण केळकर, साहित्यिक.
- १९१० – चंद्रशेखर सुब्रह्मण्यम, खगोलभौतिकी नोबेल पारितोषिकविजेत्या.
- १९२० – पांडुरंगशास्त्री आठवले, स्वाध्याय परिवाराचे संस्थापक.

### निधन

- १७४५ – जोनाथन स्विफ्ट, गलिव्हर्स ट्रॅव्हलचे लेखक.
- १९३७ – अर्नस्ट रूदरफोर्ड, अणुशास्त्रज्ञ.
- १९९५ – बेबी नाझ, हिंदी चित्रपट अभिनेत्री.

## दै. समर्थ गांवकरी जम्बो शब्दकोडे क्र. १६



**आडवे शब्द**

१. नमुना, मासला
३. वार्ताहर
७. चमकणारी बंगाली मिठाई?
१०. मिठी
१०अ. आस्था, प्रेम, माया
१२. मिठाला न जगणारा
१४. अंदाज करणे
१७. घाण
१८. 'आ'काराचे चिन्ह
१९. मांडणी, सजावट
२१. पायापासून डोक्यापर्यंत
२३. ज्वारी-बाजरीचा पदार्थ
२५. वर्तमानपत्रातीक कप्पा
२७. शूर
२९. काचेला पडलेली चीर
३०. उलटसुलट आगबोटच!
३२. सैन्याचा मालपुरवठा
३४. प्रामाणिख, सोज्वळ
३६. शत्रूच्या नाशाचे मंत्रतंत्र
३८. चामखीळ
४०. भरभराट
४१. डोंगरा किल्ला
४२. वाळा
४३. घटस्फोट
४४. मगज
४५. प्रार्थना
४६. मंत्रीमंडळ
४८. गंध उगाळण्याचे जोडसाधन
५०. आजूबाजूला
५०अ. तोरा, माज
५१. जाणीव
५२. अब्रूदार
५५. महात्मा गांधीजींचे नाव
५७. दृष्टीभेट
६१. सदोदित
६३. जुनीच्या विरुद्ध
६५. राखण करणारा
६७. चटकन, त्वरित
६८. सज्जनगडचे संत
७१. गंध
७२. अर्धांगवायू
७३. गव्हाचे पीठ
७४. मालाची विक्री
७६. सडक
७७. बाळभाषते देव
७८. कणीदार
७९. फळांचे पेय

**उभे शब्द**

१. डोंगा
२. अननुभवी
३. थापा
४. माशाची रास
५. किंमत
६. दागदागिने
७. ओरखडा
८. माझे
९. चार आठवडे
१०. पुष्परस
११. सापाची एक जात
१३. ही पिऊन लगेच गोरेपणा थोडाच मिळणार!
१५. कोंबड्याचे आवरणे
१६. कारणाशिवाय
१८. उसाच्या रसाचा घट्ट रांधा
२०. नाला, खंदक
२२. हेतू, कारण
२३. चारी ठाव जेवणातील दोन प्रमुख पदार्थ
२४. पादत्राण
२६. नासाडी, विध्वंस
२८. चांदी
३०. जून, निबर
३१. हिशोब
३३. क्षुल्लक किंमतीचे नाणे
३५. पदरी सैनिक बाळगणारा
३६. झोपेचे खोबरे!
३७. हिचे चोचले पुरवणे म्हणजे अनारोग्याला आमंत्रण
३९. एकमेकांसमोर
४३. सावरीचा असल्यास सगळ्यात मऊ
४४. तारणपत्र
४५. कमिशन, दलाली
४६. श्रीमंत
४६अ. लोखंड घसण्याचे हत्यार
४७. राख
४८. शिक्षा
४९. झोपडी
५३. दानशूर
५४. मातीचा कण
५६. पोते शिवण्याची सुई
५८. रात्री सुगंध पसरवणारी वनस्पती
५९. खाण्याची तंबाखू
६०. पातळसर
६१. पंजाबमधील एक नदी
६२. समशेर
६३. अपुऱ्या नाकाची
६५. अफूचे बीज
६६. खटला, हक्क (सांगणे)
६९. दहावी रास
७०. पुरावा असल्यास पुरेसा भक्कम
७३. खण पण कापड नव्हे
७५. पंख, दुसऱ्याचा

उत्तर उद्याच्या अंकात

**शब्दकोडे क्र. १५ चे उत्तर**

आडवे उत्तर : १.नंतर ३.नामकरण ६.भुजंग ९.जलाशय ११.सनई १३.वर्तन १४.ईश १५.तरुवर १८.वासलात १९.लव २२.पारवा २३.सोम २५.तनयतनया २८.नवकोटनारायण ३२.वानर ३३.कार ३४.रोगी ३५.सम ३६.सदा ३७.कलकलाट ३९.नकलाकार ४१.रचना ४२.रखरख ४३.क्षालन ४७.तणतण ४९.तार ५०.लाजरी ५१.दिनांक ५२.रीतसर ५३अ.जल ५४.उकीडवा ५५.सतत ५७.पलंग ५८.राजकुमार ६०.मणेर ६१.परका ६३३.वार्ताहर ६५.टमटम ६६.दम ६७.कटकट ६९.रवाना ७१.कणीदार ७३.पाया ७४.कला ७६.नयन ७८.करतल ७९.पातक ८०.थप्पी ८१.वहाण

उभे उत्तर : १.नंदीबैल २.रजई ३.नाश ४.मयत ५.रमावर ६.भुईसपाट ७.गवत ८.धन १०.लाश १२.नवा १६.रुपाया १७.रवानगी २०.वतनदार २१.गतकाल २३.सोय २४.मणका २६.नर २७.नरक २९.कोरा करकरीत ३०.नासका ३१.रामरक्षा ३२.वास ३४.रोट ३७.कनात ३८.लामणदिवा ३९.नख ४०.लाख ४२.रसकसणे ४४.लता ४५.नरमगरम ४६.निलाजरा ४८.तास ५०अ.जलज ५३.रपका ५४.उमा ५४अ.कीरवा ५६.तरट ५९.कुमक ६०.मरवा ६१.पटकन ६२.रमणीय ६४.हरकत ६६.दर ६७.कलंक ६८.टपाल ७०.नाक ७२.दानव ७५.लाथ ७७.व्रण

महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक
समर्थ गांवकरी



# नागवडे स्कूलच्या पाच व्हॉलीबॉलपटूंची विभाग स्तरावर निवड




**श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)**

क्रीडा व युवक सेवा संचलनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत अहिल्यानगर जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्या वतीने आयोजित जिल्हास्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेत येथील तुळजाभवानी सेवा प्रतिष्ठान च्या शिवाजीराव नागवडे डॅफोडील्स स्कूल व कौशल्यादेवी नागवडे इंग्लिश मीडियम स्कूलच्या १४ व १७ वर्ष वयोगट मुलींच्या संघाने कौशल्यपूर्ण खेळाचे प्रदर्शन करीत उपस्थित त्यांची मने जिंकली. सदर स्पर्धा ९ व १० ऑक्टोबर रोजी जिल्हा क्रीडा संकुल वाडिया पार्क अहिल्यानगर येथे संपन्न झाल्या. स्पर्धेमध्ये विद्यालयाच्या खेळाडू शरयू कांडेकर, जेनी साठे, गायत्री वाबळे, सर्वज्ञा भोर, श्रावणी कोकरे यांनी चेंडूवर नियंत्रण राखत सर्वोत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करीत विभागीय स्पर्धेसाठी आपली निवड पक्की केली.तसेच १५ व १६ ऑक्टोबर दरम्यान माध्यमिक विद्यालय म्हसोबाची वाडी ता इंदापूर येथे संपन्न झालेल्या पुणे विभागीय शालेय व्हॉलीबॉल स्पर्धेमध्ये देखील आपल्या कौशल्यपूर्ण खेळाचे प्रदर्शन करून विद्यालयाचे आणि श्रीगोंदा तालुक्यासह अहिल्यानगर जिल्ह्याचे नाव उंचावले. यशस्वी खेळाडूंना विद्यालयाचे क्रीडाशिक्षक अक्षयकुमार शिंदे, कैलास ढवळे, रोहित दानवे, राजश्री नागवडे यांचे मार्गदर्शन लाभले. विभागस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल खेळाडूंचे तुळजाभवानी सेवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजेंद्र दादा नागवडे, विश्वस्त अनुराधाताई नागवडे, निरीक्षक एस पी गोलांडे, मुख्याध्यापिका नीतू दुलानी यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.



अहिल्यानगर महानगरपालिका गणेशोत्सव आरस स्पर्धा- २०२५ धार्मिक व आध्यात्मिक देखावे पारितोषिक श्री महावीर प्रतिष्ठान ट्रस्ट, माणिक चौक यांच्या पंचमूखी हनुमान अवतार देखाव्याला मिळाले. यावेळी सहाय्यक आयुक्त सपना वसावा व मेहेर लहारे च्या हस्ते प्रदान करण्यात आले या वेळी मंडळाचे अध्यक्ष हर्षल बोरा,राकेश भंडारी,अक्षय मुनोत,निखील गांधी,नीरज गांधी व इतर सर्व सदस्य उपस्थित होते.

## थोडक्यात बातम्या...




### ॲथलेटिक्स स्पर्धेमध्ये यशस्वी वाटचाल

श्रीगोंदा तालुका (स. गांवकरी) : नुकत्याच जिजामाता महाविद्यालय,भेंडा येथे झालेल्या आंतर महाविद्यालयीन ॲथलेटिक्स स्पर्धेमध्ये महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयाच्या खेळाडूंनी वेगवेगळ्या इव्हेंटमध्ये उल्लेखनीय कामगिरी केली. या स्पर्धेमध्ये श्रीगोंदा एक्स्प्रेस म्हणून ओळखली जाणारी व अनेक हाफ मॅरेथॉन स्पर्धा विजेती सुरेखा मातने हिने 10,000 mts. व 5,000 mts रनिंग स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवला तसेच रिद्धी सप्रे 5000 mts. रनिंग स्पर्धेत द्वितीय क्रमांक, सविता वाळके भालाफेक व गोळाफेक मध्ये प्रथम क्रमांक, अश्विनी हिरडे 800 mts रनिंग स्पर्धेत द्वितीय क्रमांक, नांगरे ऋषिकेश 5000 mts रनिंग स्पर्धेत द्वितीय क्रमांक व मुलांच्या 4X400 mts रिले,4x100 mts रिले संघाने तृतीय क्रमांक मिळवला. या रिले संघामध्ये काळे तेजस, वायकर कृष्णा, शिंदे सुमित, राणेरजपूत करण, घोडके उज्वल यांनी उल्लेखनीय कामगिरी केली. या सर्व यशस्वी खेळाडूंची पुणे येथे होणाऱ्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,विभागीय ॲथलेटिक्स स्पर्धेसाठी निवड झाली. त्यांच्या या यशाबद्दल महाविद्यालयीन विकास समितीचे चेअरमन माजी मंत्री मान.बबनराव पाचपुते, रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य मान. राहुलदादा जगताप, महाविद्यालय विकास समितीचे सदस्य मान. बाबासाहेब भोस, मान.महावीर पटवा, प्र. प्राचार्य डॉ. महादेव जरे, उपप्राचार्य डॉ. प्रकाश साळवे, डॉ.सुदाम भुजबळ, डॉ.नितीन थोरात, जिमखाना विभाग प्रमुख प्रा. रमेश थोरात, ज्युनिअर कॉलेजचे उपप्राचार्य रत्नाकर झिटे व सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी ॲथलेटिक्स खेळाडूंचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या खेळाडूंना शारीरिक शिक्षण संचालिका कल्पना बागुल, क्रीडा शिक्षक संजय डफळ, श्री. किरण बंड व श्री.जावेद शेख यांचे मार्गदर्शन लाभले.




### कादंबरी महिला ग्रामीण पतसंस्थेकडून सभासदांना दीपावली भेटवस्तू वाटप

आळेफाटा (स. गांवकरी) : आळेफाटा (ता.जुन्नर )येथील कादंबरी महिला ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेकडून सभासदांना दीपावली भेटवस्तू वाटप करण्यात आले.कार्यक्रम सोमवार (दि.१३) रोजी आळेफाटा येथील मुख्य शाखेत सकाळी १०:०० सर्व सभासदांच्या उपस्थितीत पार पडला. पतसंस्थेचे मुख्य व्यवस्थापक दिनेश आग्रे यांनी पतसंस्थेची माहिती देताना सांगितले की,यावर्षी संस्थेने एकूण अकरा कोटींची वार्षिक उलाढाल केली असून संस्थेत नऊ कोटी पन्नास लाख रुपयांच्या ठेवी आहे. संस्थेने एकूण सहा कोटी पंचवीस लाख रुपये कर्ज वाटप केले आहे.तसेच सभासद संख्या ८९० इतकी आहे. संस्था नेहमी ऑडिट 'अ ' मधे येत आहे. यावर्षी संस्थेच्या वतीने सभासदांना १०% लाभांश देखील देण्यात येईल अशी माहिती दिली.यावेळी पतसंस्थेच्या संस्थापक अध्यक्षा सारिका दिनेश आग्रे, संचलिका कामिनी काकडे, शितल बेळे, नंदा कसाळ, नीता भोंडवे, प्रियांका गुंजाळ तसेच पतसंस्थेचे मार्गदर्शक सभासद नाथा भोर, पिराजी चौधरी, रविकांत सावंत, जालिंदर पठाडे, दीपक रोकडे, बारकू भुजबळ, सुभाष लोंढे, गणेश गुंजाळ, रवी चंगेडिया, संतोष बेळे, विनायक काकडे, सारिका गडगे, निर्मला भुजबळ, सुनीता भुजबळ, मंदा सावंत, संगीता चौधरी, रुपाली चंगेडिया, वैशाली शिंदे,सविता गुंजाळ, पतसंस्थेचे कर्मचारी वृंद आदी सभासद वर्ग उपस्थित होता. आलेल्या सर्व उपस्थितांचे संस्थेचे मुख्य व्यवस्थापक दिनेश आग्रे यांनी आभार मानले.

### डोंगरगाव येथील कै.सौ.सुमनबाई बबनराव उगले यांचे दुःखद निधन



डोंगरगाव (स. गांवकरी) : डोंगरगावचे मा सरपंच ज्येष्ठ नेते श्री बबनराव उगले यांच्या पत्नी कै:सुमनबाई बबनराव उगले यांचे शुक्रवार दि. 17/10/2025 रोजी वय 79 दुःखद निधन झाले.त्यांच्या पश्चात पती, दोन मुले,चार मुली,सुना,पुतणे,नातवंडे,जावई असा मोठा परिवार आहे. माजी सरपंच बबनराव गबाजी उगले यांच्या पत्नी व विजय बबनराव उगले,राहुल बबनराव उगले यांच्या त्या मातोश्री होत. डोंगरगाव येथील स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.यावेळी विविध क्षेत्रातील मोठा जनसमुदाय उपस्थित होता. त्यानिमित्त आज मा:विधानपरिषद सदस्य डॉ सुधीरजी तांबे साहेब,तसेच स्वदेश समूहाचे सर्वेसर्वा बाळासाहेब देशमाने यांनी सांत्वनपर भेट दिली. ह्यावेळी उगले कुटुंबाने सामजिक भान जपत असताना नदी प्रदूषित होणार नाही ह्याची काळजी घेतली व रक्षा विसर्जन नदीपात्रात न करता स्वतःच्या शेतात रक्षा विसर्जित करून कै:सुमनबाई उगले यांच्या समरणार्थ वृक्षांची लागवड केली,व समाजाला एक नवीन आदर्श निर्माण करून दिला. त्याप्रसंगी कुटुंबातील सर्व सदस्य ,सर्व नातेवाईक,गावातील आणि परिसरातील सर्व आप्तेष्ट मित्रपरिवार व उगले कुटुंबावर प्रेम करणारे सर्वच उपस्थित होते.

# 'वाद्यरंग' महोत्सवात अहिल्यानगर जिल्ह्यातील दुर्मिळ पारंपारिक लोककलांचे




**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभाग व सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने प्रभादेवी मुंबई येथील कलांगणच्या व्यासपीठावर अहिल्यानगर जिल्ह्यातील शेवगाव, श्रीगोंदा, राहुरी, नेवासा तालुक्यातील दुर्मिळ व पारंपारिक लोककलावंतांनी आपली विविध रंगी कला सादर करून सप्तरंगाची उधळण केली. महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री ना. ॲड. आशिष शेलार यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या कार्यक्रमास वित्त राज्यमंत्री आशिष जयस्वाल, सांस्कृतिक खात्याचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी, सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक विभीषण चवरे, सहसंचालक श्रीराम पांडे आदी मान्यवर उपस्थित होते.

अहिल्यानगर जिल्ह्यातील लोककला अभ्यासक व मुक्त पत्रकार भगवान राऊत यांच्या पुढाकारातून रामनगर शेवगाव येथील स्मशान जोगी लक्ष्मण शेंडरे, हनुमंता कडमींचे, डक्कलवार धर्मा कांबळे, रामा यशवंत वीर, नेवासा तालुक्यातील नजीक चिंचोली येथील गोंधळी दिगंबर गोंधळी, राहुरी तालुक्यातील देवळाली प्रवरा येथील पिंगळा जोशी दिलीप वायफळकर, बालाजी वायफळकर, श्रीगोंदा तालुक्यातील ढोकराई येथील शामराव शिंदे, मारुती शिंदे, राजू शिंदे व शिवाजी थिटे आदी कलावंत घाटोळे, शंख, किंगरी, संबळ, दिमडी, गुडगुडी, सारंगी आदी दुर्मिळ व पारंपारिक वाद्य घेऊन सहभागी झाले होते.

प्रभादेवी येथील रवींद्र नाट्य मंदिरा शेजारी कलांगण परिसरात विविध दुर्मिळ व पारंपारिक वाद्यांचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री ना. ॲड. आशिष शेलार यांच्या शुभहस्ते फीत कापून या प्रदर्शन व वाद्यरंग महोत्सवाचे शानदार उद्घाटन झाले. यावेळी सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक विभीषण चवरे यांनी सांस्कृतिक मंत्री ॲड. आशिष शेलार यांना विविध दुर्मिळ व पारंपारिक वाद्य तसेच महाराष्ट्रातील विविध पारंपारिक लोककलांबद्दल माहिती दिली. मान्यवरांच्या हस्ते विधिनाट्य व इतर पुस्तकाचे प्रकाशन तसेच टपाल तिकिटाचे अनावरण करण्यात आले.

वाद्यरंग हा अतिशय उत्तम कार्यक्रम असून महाराष्ट्राच्या लोकसंस्कृतीमध्ये विविध पारंपारिक लोककला व लोकवाद्यांचे उच्च स्थान आहे. वाद्यरंग महोत्सवात सहभागी झालेल्या सर्व लोक कलावंतांचे त्यांनी कौतुक केले.

या कार्यक्रमास अहिल्यानगर आकाशवाणी केंद्राचे माजी कार्यक्रमाधिकारी बाबासाहेब खराडे, भारतीय कम्युनिस्ट पार्टीचे राज्यसचिव ॲड. कॉम्रेड सुभाष लांडे पाटील, सेवानिवृत्त पोलीस उपनिरीक्षक तथा कवयित्री रीता जाधव यांनी अहिल्यानगर जिल्ह्यातील कलावंतांच्या प्रत्यक्ष भेटी घेऊन त्यांच्या कलेचे कौतुक केले.

या कार्यक्रमात पालघर व ठाणे जिल्ह्यातील विविध आदिवासी पाड्याहून तारपा, तुर, गांगळी, डाक, सुरथाळ, सनई, संबळ अशी वाद्य घेऊन विवाह सुनाड, अर्जुन नडगे, जाना देऊ, वाजे लक्ष्मण, गोविंद गंगा, गोविंद सिताराम, बर्फ तुकाराम खरपडे, राजन वैद्य असे कलावंत सहभागी झाले होते.

त्याचबरोबर नाशिक जिल्ह्यातील सुरगाणा तालुक्यातील अनेक आदिवासी बंधू भगिनी डेरा, मादळ, नगरा सारखी वाद्य घेऊन सहभागी झाले होते.

# नगर अर्बनच्या ठेवीदारांना ऑक्टोबर अखेर ६५ टक्के रकमा परत

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

भारतीय रिझर्व बँकेने नगर अर्बन को- ऑपरेटिव्ह बँकेचा परवाना ४ ऑक्टोबर २०२३ रोजी रद्द केला होता. गेल्या दोन वर्षाच्या काळात थकीत कर्जाची वसुली प्रक्रिया वेगाने राबवून १५ ऑक्टोबर २०२५ पर्यंत २२१५ ठेवीदारांच्या ६५ टक्के रकमा परत करण्यात आलेल्या आहेत. उर्वरित ३५ टक्के रकमा परत करण्याचे नियोजन सुरू असून या रकमादेखील लवकरच परत करण्यात येणार असल्याची माहिती बँकेचे अवसायक गणेश गायकवाड यांनी दिली. बँकेचा बँकिंग परवाना रद्द झाल्यानंतर बँकेच्या दैनंदिन खर्चात कपात करण्याच्या दृष्टीने भाडेतत्त्वावर शाखा कार्यालय असलेल्या बँकेच्या सर्व शाखा बंद करण्याचा निर्णय बँक प्रशासनाने घेतला. त्याचबरोबर स्वमालकीचे कार्यालय असलेल्या शाखा बंद करून त्यांचे कामकाज मुख्य शाखेत वर्ग करण्यात आले. त्यामुळे बँकेच्या दैनंदिन खर्चात मोठ्या प्रमाणात बचत झाली. याचबरोबर थकीत कर्जदारांकडील कर्ज वसुली, तारण मालमत्ता ताब्यात घेऊन त्यांचा लिलाव आदी प्रक्रिया वेगवान करण्यात आली होती.

# श्रीगोंदेकरांच्या अग्नीपंखावर माजी सैनिकांची राखेतून फिनिक्स भरारी




**श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)**

माजी सैनीक नवनाथ खामकर यांच्या श्रीगोंदा शहरातील संकल्प एस मार्ट किराणा मॉलला दि. २१ सप्टेंबरच्या आग लागली काही तासात जीवन उध्वस्त झाले अशा परिस्थितीत श्रीगोंदेकरांच्या मदतीचे हात पुढे २७ लाखाच्या लोकसहभागातून नवनाथ खामकर यांचा मॉल २ हजार चौरस फुटाचा मॉल पुन्हा उभा करण्याची अवघ्या १७ दिवसात किमया झाली या माजी सैनीक मित्राच्या चेहऱ्यावर हास्य उमलले. दि २१ सप्टेंबरच्या रात्री विजेचे शार्ट सर्किट होऊन नवनाथ खामकर व मयुरेश धारकर यांचा मॉल जळून खाक झाला. नवनाथ खामकर यांनी आपण पुन्हा उभे राहू शकत नाही त्यामुळे श्रीगोंदेकरांचा निरोप घेण्याच्या मनस्थितीत होते पण मेजर तुम्ही जाऊ नका आम्ही तुमच्या बरोबर आहोत असा शब्द मित्रांनी दिला आणि नवनाथ खामकर यांचेसाठी जम्मु काश्मिर पासून कन्याकुमारी पर्यत अनेक मदतीचे हात पुढे आले २७ लाखाचा लोकसहभाग तयार झाला. बांधकाम व्यावसायिक नवनाथ दरेकर व नानासाहेब कोंथिबीरे यांनी निस्वार्थ भावनेने मॉलचे बांधकामावर लक्ष दिले. माजी सैनिक संघटना व हरिओम योगा ग्रुपने दररोज श्रमदानाची लढाई केली. आणि अवघ्या १७ दिवसात मॉल उभा राहिला आणि व्यापारी बांधवांच्या मदतीने हा मित्रप्रेम मॉल पुन्हा सेवेत दाखल झाला. आणि श्रीगोंदेकरांनी जल्लोष केला. या मॉलचे उद्घाटन विद्यार्थी व माजी मंत्री बबनराव पाचपुते यांचे हस्ते करण्यात आले यावेळी खासदार निलेश लंके अनुराधा नागवडे शुभांगी पोटे सतिश बोरा पोपटराव खेतमाळीस ज्योती खेडकर अभिषेक दंडनाईक राजू गोरे रा. राहुल कोठारी संदीप सांगळे संजय लाकूडझोडे शहाजी खेतमाळीस अंकुश खोटे रमाकांत चिकणे हे उपस्थित होते. आभार नवनाथ खामकर मेजर यांनी मानले.

# पैलवान संदीप गायकवाड याची शालेय राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड




**श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)**

दिनांक 14 ते 16 ऑक्टोबर 2025 रोजी त्रिमूर्ती संकुल नेवासा फाटा येथे पार पडलेल्या शालेय राज्यस्तरीय 19 वर्षे मुले व मुली कुस्ती स्पर्धेमध्ये महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयातील तीन खेळाडू संदीप गायकवाड, श्रुतिका पवार व समीक्षा टोणगे यांनी आपापल्या वजन गटांमध्ये अतिशय उत्कृष्ट आणि उल्लेखनीय कामगिरी करत राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये मेडल प्राप्त झाले त्यामध्ये पैलवान संदीप गायकवाड याने 77 kg ग्रिको रोमन कुस्ती स्पर्धेत अतिशय छान कुस्त्या करत राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक मिळवला त्याची एक नोव्हेंबर ते पाच नोव्हेंबर 2025 रोजी हरियाणा पानिपत येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली. तसेच पैलवान श्रुतिका पवार हिने 76 kg वजन गटामध्ये सिल्वर मेडल तर पैलवान समीक्षा टोणगे येणे 62 kg वजन गटामध्ये ब्रांझ मेडल मिळवले. तीनही खेळाडूंनी अतिशय उत्कृष्ट कामगिरी केली व महाराजा कॉलेज व श्रीगोंदा तालुक्याचे नाव सर्व राज्यस्तरावर गाजवले.

# मेकॅनिकल इंजिनिअरिंगच्या विद्यार्थ्यावर जीवघेणा हल्ला

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

२२ वर्षीय मेकॅनिकल इंजिनिअरिंगच्या विद्यार्थ्यावर जीवघेणा हल्ला केल्याची घटना १५ ऑक्टोबर रोजी रात्री भिस्तबाग पडक्या महालाजवळ घडली. या प्रकरणी बालाजी प्रकाश श्रीगादी (रा. लक्ष्मी टॉवर कॉलनी, तपोवन रोड) यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून शेरॉन सुरेश पंडीत, ॲलेक्स उर्फ जॉय नितीन सोनवणे (दोघे रा. डॉन बॉस्को कॉलनी), धीरज उर्फ जॅकी जॉन आवारी (रा. गणेश चौक, बोल्हेगाव फाटा) आणि एका अनोळखी व्यक्तीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बालाजी श्रीगादी हे आपल्या (एमएच १२ एमजी ०१२८) क्रमांकाच्या दुचाकीची सर्व्हिसिंग करून घरी परतत असताना, पाठीमागून आलेल्या चार जणांच्या गाडीने त्यांच्या दुचाकीला धडक दिली. त्यातील एकाने शिवीगाळ करत मारहाण केली.

# शिवाजीराव नागवडे विधी महाविद्यालया ई लायब्ररीचे उद्घाटन समारंभ संपन्न




**श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)**

श्रीगोंदे तालुक्यातील शिवाजीराव नागवडे विधी महाविदयालयात ई लायब्रीचे उद्घाटन तुळजाभवानी सेवा प्रतिष्ठानच्या सचिव अनुराधा नागवडे यांच्या शुभहस्ते करण्यात आले . कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ अंजुला चौबे ह्या होऱ्या

शिवाजीराव (बापू) यांना शिक्षणाबद्दल फार आत्मियता होती. त्यांना ग्रामिण भागातील शेतकरी कष्टकरांच्या मुलांना शिक्षण घेण्यासाठी अनुकूल वातावरण नव्हते हे लक्षात आल्यानंतर सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून तालुक्याच्या विकासाला चालना दिली . तालुक्यात विकास कामानिमित फिरत असता त्यांना शिक्षणाची ज्ञानगंगा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न केले . उच्चशिक्षण तसेच तंत्रनिकेतना बरोबर विधी महाविद्यालयाची स्थापना केली . तळागाळातील गरिब गरजू विद्यार्थी यांना तालुक्यात सुविधा उपलब्ध करून दिली.

स्पर्धेच्या विज्ञान युगात संगणकिय ई लायबरी सुरू होत असल्याचे गौरवोदगार अनुराधा नागवडे यांनी काढले .

या ई लायब्ररीमुळे विद्यार्थ्यांना कायदे आणि न्याय निर्णय डिजिटल पद्धतीने सहज उपलब्ध झाल्यामुळे विद्यार्थ्यां मध्ये आनंदी उत्साही वातावरण होते .

यावेळी विद्यार्थ्यांचे मनोगते व्यक्त करते वेळी महाविद्यालयाचे आभार मानले. ॲड जयंत शिंदे, ॲड प्रसाद इंगळे ,ॲड सुनिल भोस , ॲड अशोक रोडे ,यांनी पहिल्या व दुसऱ्या वर्षातील विद्यार्थ्यांना कायद्या विषयी मार्गदर्शन केले . त्यांच्या काळातील अनुभव व्यक्त केले .

यावेळी अमोल नागवडे, सुर्यभान गोलांडे , प्रा पुरुषोत्तम फाटे . प्रा रुपाली गोळे आदी मान्यवरा सह विद्यार्थी उपस्थित होते कार्यक्रम यशस्वितेसाठी अर्पित रणसिंग क्षितीज शितोळे आदित्य दानवे यांच्यासह विद्यार्थ्यांनी परिश्रम घे तले

प्रा पुरुषोत्तम फाटे . प्रा साक्षी प्रथमशेट्टी यांनी सुत्रसंचलन केले तर प्रा पुरुषोत्तम फाटे यांनी आभार मानले.

# दिवटे गावच्या विकासाला मिळणार नवी दिशा

■ दिवटे ग्रामपंचायतीच्या उपसरपंच पदी सौ.सोनल प्रकाश कणसे यांची बिनविरोध निवड



**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

जिल्ह्यातील दिवटे ग्रामपंचायत ता. शेवगाव येथील ग्रामपंचायतीच्या उपसरपंच पदी सौ.सोनल प्रकाश कणसे यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे.उपसरपंच सौ. सुनीता सांगळे यांनी दुसऱ्या सदस्याला उपसरपंच होण्याची संधी मिळावी म्हणून राजीनामा दिला होता. त्यामुळे रिक्त झालेल्या उपसरपंच पदासाठी आज दिवटे येथील ग्रामपंचायत कार्यालयात सरपंच सौ.मनीषा माळी यांच्या अध्यक्षतेखाली निवडणूक प्रक्रिया पार पडली. यावेळी झालेल्या ग्रामपंचायत सदस्यांच्या बैठकीत उपसरपंच पदासाठी सौ.सोनल कणसे यांच्या नावावर एक मताने शिक्कामोर्तब करण्यात आला. सौ.सोनल कणसे यांनी एकमेव उमेदवारी अर्ज दाखल केल्यामुळे उपसरपंच पदी सौ.सोनल प्रकाश कणसे यांची बिनविरोध निवड झाल्याचे निवडणूक सहाय्यक व ग्रामपंचायत अधिकारी गोकुळ बळीद यांनी जाहीर केले.यावेळी सूचक, सौ.नंदा वंजारी अनुमोदक सौ.सुनिता सांगळे उपस्थित होते. उपसरपंच निवडीनंतर सौ.सोनल कणसे यांचा ग्रामपंचायत सदस्यांच्या वतीने सत्कार करण्यात आला.तसेच यावेळी गुलाल उधळून कार्यकर्त्यांनी जल्लोष साजरा केला. यावेळी सरपंच मनीषा माळी, उपसरपंच सुनीता सांगळे, निवडणूक अधिकारी गोकुळ बळीद, भागवत कणसे,भाऊराव जावळे गुरुजी,नानासाहेब कणसे ,काकासाहेब जावळे,नामदेव कणसे,सोपान कणसे, बाबुराव माळी, लक्ष्मण कव्हळे, नामदेव जावळे, किशोर कणसे, संतोष सांगळे सुरेश सांगळे,भैया कणसे, सुभाष चव्हाण,अनिल पवार, सुनील सांगळे,कृष्णा कणसे, महेश जावळे, सुधीर जावळे, राजू जावळे विजय वंजारी, आदिनाथ माळी, बापूराव भराट, गोकुळ भराट आबासाहेब वंजारी, ज्ञानेश्वर कणसे आदी उपस्थित होते.




अहिल्यानगर (समर्थ गांवकरी) :- दिवाळी सणाची सुरुवात व वसुबारसे पासून होते. वसुबारस हा एक हिंदु सण आहे. श्रीकृष्ण जन्माच्या आधीच्या पंधरवड्यात येतो.गाय ही संपत्ती आणि समृद्धीचे प्रतीक मानले जाते. वसुबारस सणाच्या निमित्ताने गाय आणि वासरांची पूजा करून या सणाच्या माध्यमातून पर्यावरण आणि प्राणी मात्र बद्दल आपली जबाबदारी अधोरेखित केली आहे.गेल्या चार वर्षापासून मंडळाच्या वतीने हा उपक्रम राबविण्यात येत आहे.गोमाता पूजन ही हिंदू संस्कृती आहे.असे प्रतिपादन भारतीय जनता पार्टीचे मध्य मंडल अध्यक्ष मयूर बोचुघोळ यांनी केले आहे.

## थोडक्यात बातम्या...



### स्वारातीम विद्यापीठाच्या ज्ञानस्रोत केंद्रात दिवाळी अंक प्रदर्शनाचे उद्घाटन

नांदेड (स. गांवकरी) : स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या ज्ञान स्रोत केंद्रात दि.१८ ऑक्टोबर २०२५ रोजी दिवाळी अंकांचे भव्य प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. या प्रदर्शनाचे उद्घाटन विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या शुभहस्ते झाले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन यांची मुख्य उपस्थिती होती. ज्ञानस्रोत केंद्राचे प्रभारी संचालक डॉ. जगदीश कुलकर्णी यांनी मान्यवरांचे स्वागत केले. प्रख्यात लेखक डॉ. पी. विठ्ठल, डॉ. वैजनाथ अनमुलवाड यांच्यासह अनेक संशोधक आणि विद्यार्थी यावेळी उपस्थित होते. महाराष्ट्रातील विविध नामवंत प्रकाशनांचे दिवाळी अंक ज्ञानस्रोत केंद्राने उपलब्ध करून दिले आहेत. या प्रदर्शनाच्या निमित्ताने कुलगुरूंनी सर्व प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी, संशोधक व विद्यार्थ्यांनी या 'अक्षर फराळा'चा लाभ घेण्याचे आवाहन केले. या प्रदर्शनात 'मिळून साऱ्याजणी', 'आवाज', 'मैत्र', 'ऋतुरंग', 'पद्मरत्न', 'साप्ताहिक सकाळ', 'अक्षर धारा', 'हेर', 'हंस', 'पद्मगंध', 'साधना', 'मानीनी', 'महानुभाव', 'छंद', 'कालनिर्णय', 'ग्रहसंकेत', 'सकाळ ॲग्रोवन', 'शतायुशी', 'लोकसत्ता', 'लोकमत', 'महाराष्ट्र टाईम्स', 'मार्मिक', 'अक्षर', 'अनुराधा', 'गृहलक्ष्मी', 'ग्राहकहित', 'फ्रिक्र', 'चंपक', 'अक्षरलिपी', 'प्रथा', 'किस्त्रीम', 'उत्कर्ष', 'मनोकल्प', 'भवताल', 'पुढारी', 'संस्कृती' इत्यादी दिवाळी अंक वाचकांसाठी उपलब्ध करण्यात आले आहेत. या दिवाळी अंक प्रदर्शनाच्या यशस्वी आयोजनासाठी ज्ञानस्रोत केंद्रातील कर्मचारी गणेश लाठकर, डॉ. अरुण हंबर्डे, विठ्ठल मोरे, संदीप डहाळे, खाजामिया सिद्दिकी, मोहनसिंग पुजारी, माधव लुटे, दयानंद पोपळे, तिरुपती हंबर्डे व योगेश हंबर्डे यांनी अथक परिश्रम घेतले.

### माणुसकी अजून जिवंत आहे!' — इंजि. विश्वंभर पवार यांचा आदर्शवत पुढाकार



भोकर (स. गांवकरी) : अवघ्या सात वर्षांच्या निरागस चिमुरडीला जीवघेण्या ब्लड कॅन्सरने ग्रासले असून घरची आर्थिक परिस्थिती हालाखीची असल्याने उपचारासाठी पालकांनी मदतीचे आवाहन केले असता, समाजसेवक इंजि. विश्वंभर पवार यांनी माणुसकीचा हात पुढे करीत उदात्त भावनेतून रु. ११,०००/- ची मदत उपचारासाठी देऊन आपली सामाजिक बांधिलकी जपली. दि. १६ ऑक्टोबर २०२५ रोजी लोहा-कंधार विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या हस्ते मुलीच्या वडिलांकडे सुपूर्द करण्यात आली. याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे नांदेड उत्तर जिल्हाध्यक्ष बाळासाहेब पाटील रावणगावकर, माजी आमदार मोहनराव हंबर्डे, माजी आमदार सुभाष साबणे, माजी सभापती नागनाथ घिसेवाड, तालुकाध्यक्ष राजेश्वर कदम देशमुख, आनंद पाटील ढवळे, आनंद डांगे आदी मान्यवर उपस्थित होते. महात्मा गांधी नगर येथील राजू श्रीपतवार यांची सात वर्षांची कन्या ब्लड कॅन्सर सारख्या गंभीर आजाराशी झुंज देत असून तिच्यावर नांदेडसह इतर शहरांतील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. कुटुंबाची आर्थिक स्थिती अत्यंत कमजोर असल्याने उपचारासाठी समाजातील दानशूरांनी पुढे यावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले. या मदतीमुळे श्रीपतवार कुटुंबियांच्या डोळ्यांत आनंदाश्रू दाटले. त्यांनी इंजि. पवार यांचे मनःपूर्वक आभार मानले. मानवतेचा झरा अखंड वाहता ठेवणाऱ्या अशा समाजसेवी हातांनी 'माणुसकी जिवंत आहे' याची पुन्हा एकदा प्रचिती दिली आहे.

### अतिवृष्टीच्या फटक्याने खरीप हंगामी पैसेवारी घसरली ३७ पैशांवर

किनवट (स. गांवकरी) : खरीप हंगाम २०२५ मधील पिकांची हंगामी (नजरअंदाज) पैसेवारी ३० सप्टेंबर रोजी तालुका महसूल प्रशासनाकडून जाहीर करण्यात आली. त्यानुसार किनवट तालुक्याची सरासरी हंगामी पैसेवारी ३७ पैसे नोंदवली गेली असून, तालुक्यातील १९१ गावांपैकी एकाही गावाची पैसेवारी ५० पैशां पर्यंत पोहोचलेली नाही. तालुक्यातील पैसेवारी लागू असलेल्या सर्व १९१ गावांचे लागवडीयोग्य क्षेत्र एकूण ८१ हजार ०७४. ७८ हेक्टर आहे. त्यापैकी खरीप हंगामात ७९ हजार १४१ हेक्टर क्षेत्रावर पेरणी झाली, तर २ हजार २२८. ७८ हेक्टर क्षेत्र पडीक राहिले. यंदाच्या पावसाळ्यात तालुक्यात एकूण १२ अतिवृष्टीच्या घटना नोंदल्या गेल्या आहेत. महसूल मंडळनिहाय पाहता, जलधारा मंडळात ९, शिवणी मंडळात ७, सिंदगी मोहपूरमध्ये ५, इस्लापूर, मांडवी, दहेली व उमरीबाजार मंडळात प्रत्येकी ४ तर किनवट व बोधडी मंडळात प्रत्येकी ३ अतिवृष्टी झाल्याची नोंद आहे. अशा प्रकारे एकूण ४३ वेळा अतिवृष्टी झाल्याने खरीप पिकांचे फार मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ परिसर संघाने रचला इतिहास

## संगीत विभाग व नाट्य विभागाची दमदार कामगिरी

**नांदेड : (समर्थ गांवकरी)**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड आयोजित ग्रामीण टेक्निकल अँड मॅनेजमेंट कॅम्पसच्या ग्रामीण विज्ञान महाविद्यालय, विष्णुपुरी, नांदेड येथे दि.१२ ते १५ ऑक्टोबर, २०२५ यादरम्यान संपन्न झालेल्या 'ज्ञानतीर्थ २०२५' आंतरमहाविद्यालयीन युवक महोत्सवामध्ये स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ परिसर संघाने विजेतेपद पटकावत इतिहास रचला. या युवक महोत्सवामध्ये १५ सुवर्ण, एक रौप्य आणि सहा कांस्यपदकांची कमाई करत विद्यापीठ परिसर संघाने 'ज्ञानतीर्थ २०२५'च्या जनरल चॅम्पियनशिपवर आपले नाव कोरले आहे.

या युवक महोत्सवामध्ये शास्त्रीय सुरवाद्य, सुगम गायन भारतीय, सुगम गायन पाश्चात्य, वादविवाद, चित्रकला, पोस्टर मेकिंग, स्थळ छायाचित्रण, कोलाज, उत्कृष्ट दिग्दर्शन, उत्कृष्ट अभिनय पुरुष,



एकांकिका, मूक अभिनय, लोकसंगीत, कव्वाली, समूह गायन भारतीय या कलाप्रकारांमध्ये प्रथम क्रमांक प्राप्त केला. तसेच पोवाडा कलाप्रकारात द्वितीय व व्यंगचित्रकला, लावणी, समूह गायन पाश्चात्य, जलसा, विडंबन अभिनय या कला प्रकारांना तृतीय पारितोषिक प्राप्त झाले. या संघामध्ये प्रदीप नरवाडे, गुंजन शिरभाते, वैभव घुटे, सलोनी सुकते, साईप्रसाद बयास, कुंडलिक घाटोळ, पूजा सुपेकर, प्रतीक्षा बूंदराळे, संजय भराडे, ऐश्वर्या टिंगरे, गणेश महाजन, गणेश इंगोले, धीरज कुमार प्रधान, विश्वनाथ माटाळकर, श्रीनिवास लंकावाड, मंगेश भालेराव, रत्नदीप गवळी, प्रियंका कोल्हे, मीनाक्षी आडे, नालंदा सांगवीकर, प्रशांत चित्ते, तुषार वडणे, सोनू गवळी, कावेरी कौसडीकर, प्रीती भुताळे, आदिती केंद्रे, अभिषेक शिंदे, अभिजीत भड, मृण्मयी अग्रवाल या विद्यार्थ्यांनी वरील कलाप्रकारांमध्ये घवघवीत यश संपादन केले. पारितोषिक वितरण समारंभप्रसंगी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.मनोहर चासकर, प्र-कुलगुरू डॉ.अशोक महाजन, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ.प्रशांत पेशकार, डॉ.सूर्यकांत जोगदंड, डॉ.डी.एन. मोरे, नारायण चौधरी, डॉ.हनुमंतराव कंधारकर, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ.राजेश्वर दुडूकनाळे व सकाळ पेपरचे संपादक सिद्धाराम पाटील, मुंबई येथील सनरायझिंग प्रोसेसिंग इंडस्ट्रीचे संचालक निळकंठ चौधरी व इतर मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये संघाला जनरल चॅम्पियनशिप विजेतेपद बहाल करण्यात आले.

# निवडणुका स्वबळावर लढणार - गोविंदराम शूरनर

**नांदेड : (समर्थ गांवकरी)**

राष्ट्रीय समाज पक्षाची दि १८ आक्टोबंर रोजी बैठक मुखेड येथील रेस्ट हाऊस येथे तालुकाध्यक्ष संदिप जायनूरे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकिला मार्गदर्शन करण्यासाठी राष्ट्रीय संघटक गोविंदराम शूरनर उपस्थित होते. बैठकिला मार्गदर्शन करताना गोविंदराम म्हणाले, माननीय संस्थापक अध्यक्ष महादेवजी जानकर व प्रदेशाध्यक्ष काशीनाथ शेवते यांच्या आदेशानुसार राष्ट्रीय समाज पक्षाने स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका या येणाऱ्या आगामी नगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुका स्वबळावर लढविणार आहे. तरी सर्व कार्यकर्त्यांनी निवडणुकीच्या तयारीला लागावे व बुथ बांधणी करावी असे सांगितले. तालुकाध्यक्ष संदीप जायनुरे म्हणाले मुखेड तालुक्यातील जिल्हापरिषद, पंचायत समिती,नगर पालिकेत सर्वच्या सर्व उमेदवार उभे करणार असुन, पंचायत समिती व नगरपालीकेवर रासपाचा झेंडा फडकेल असे आश्वासन दिले. यावेळी डि के पाटील, मुखेड तालुकाध्यक्ष संदीप पाटील, मुखेड युवाध्यक्ष शंकर पाटील श्रीरामे ,मुखेड महिलाध्यक्ष जनाबाई कांबळे, शिवराज पाटील, डी एन मोरे, अनिल कोल्हे, मल्हारी देवकते, भुजंग देवरे, राजू श्रीरामे,जगदीश तसेच तालुक्यातील सर्व सर्कल मधून कार्यकर्ते उपस्थित होते.

# महाराणी येसुबाईंच्या वंशजांची पारिवारीक सदिच्छा भेट

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

लोहगाव पुणे येथे दिनांक १७ ऑक्टोबर रोजी ऐतिहासिक राजेशिर्के घराण्याचे सोयरे, राजमाता जिजाऊंचे जन्मस्थळ असलेल्या सिंदखेड राजा येथील राजमाता जिजाऊ साहेबांचे वंशज, श्रीमंत लखुजीराजे शिक्षण संकुल संस्थेचे अध्यक्ष व सिंदखेड राजा पंचायत समितीचे माजी सभापती माननीय श्री. शिवाजीराव राजे जाधव (बापु) यांनी ऐतिहासिक ठिकाण पेडगांव, किल्ले धर्मवीरगड येथील वंशज पत्रकार श्री लक्ष्मीकांत राजेशिर्के यांच्याशी भ्रमणध्वनी द्वारे संपर्क करून घरगुती पारिवारिक चर्चा करत, पुणे येथील राजेशिर्के




यांच्या प्रशिक्षण संस्थेच्या संपर्क कार्यालयात राजेशिर्के घराण्याची सदिच्छा भेट घेऊन घरगुती सुख दुःखासह विविध ऐतिहासिक, सामाजिक, राजकीय विषयांवरही सविस्तर चर्चा केली.

पुणे येथील भेटी दरम्यान श्रीमंत शिवाजी राजे जाधव यांनी महाराणी येसुबाई राजाऊ साहेब तथा स्वराज्यनिष्ठ श्रीमंत राजेशिर्के घराण्याचे वंशज, राष्ट्रवादीचे प्रदेश नेते तथा राष्ट्रवादी काँग्रेस माजी सैनिक सेलचे प्रदेशाध्यक्ष माननीय दिपकराजे शिर्के यांच्याशी घरगुती चर्चा करत, राजेशिर्केंच्या परिवारात गेल्या ८ ते ९ महिन्यात ज्या दोन्ही दुःखद घटना झाल्या त्यावर बोलताना म्हणाले की, सिंदखेड राजा येथील राजे जाधव वंशज घराणे व ऐतिहासिक वंशज घराण्यातील सर्वच राजघराणे व सरदार घराण्यातील वंशज मंडळी राजेशिर्के वंशजांसोबत आहोत असा भावनिक धीर देत राजेशिर्के परिवाराला आधार दिला.

भेटीप्रसंगी राजेशिर्केंची प्रसिद्ध असलेली लोहगाव- पुणे येथील साई डिफेन्स अँड पोलिस करियर प्रशिक्षण संस्थेची माहिती श्रीमंत शिवाजीराजे जाधव यांना दिली.

याप्रसंगी प्रशिक्षण संस्था, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी व श्रीमंत राजेशिर्के वंशज घराण्याच्या वतीने परंपरेने नुसार उपस्थित सर्व मान्यवरांचा आदर सन्मान केला.

# एचआयव्ही बाधितांसाठी दिवाळी फराळ वाटप कार्यक्रम

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

समाजातील सर्व घटकांपर्यंत सणाचा आनंद पोहोचावा या उद्देशाने एन. ए.डी. पी.+ संस्था,अहमदनगर ( नेटवर्क ऑफ अहमदनगर डिस्ट्रिक्ट बाय पीपल लिविंग विथ एच आय व्ही/ एड्स ) तर्फे एचआयव्ही बाधित नागरिकांसाठी दिवाळी फराळ वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून रोटरी क्लब ऑफ अहमदनगर सेंट्रल चे अध्यक्ष रो. सुनील कटारिया व सचिव रो.



अमर गुरप, जिल्हा रुग्णालयचे जिल्हा कार्यक्रम अधिकारी शिवाजी जाधव हे होते. एन. ए.डी. पी.+ संस्थेचे संस्थापक अध्यक्ष व जिल्हा एड्स नियंत्रण समिती सदस्य प्रशांत येंडे उपस्थित होते.

कार्यक्रमात फराळातील लाडू, चिवडा, करंजी, चकली, अनारसे यांचे वाटप करण्यात आले. लाभार्थ्यांनी आनंद व्यक्त करून आयोजकांचे मनःपूर्वक आभार मानले. रोटरी क्लब ऑफ अहमदनगर सेंट्रल चे अध्यक्ष रो. सुनील कटारिया म्हणाले "एचआयव्ही बाधित बांधव हे आपल्या समाजाचा अविभाज्य भाग आहेत. त्यांच्या चेहऱ्यावर हसू फुलवणे हीच खरी दिवाळी आहे. या कार्यातून समाजात सहानुभूती व संवेदनशीलतेचा दीप प्रज्वलित होत आहे."

# मंडलापुर येथे महर्षी वाल्मिक ऋषी जयंती साजरी !

**मुखेड ता : (समर्थ गांवकरी)**

मुखेड तालुक्यातील मौजे मंडलापुर येथे दि. १८ आक्टोंबर रोजी आद्य कवी महर्षी वाल्मिक ऋषी जयंतीनिमित्त सकाळी महर्षी वाल्मीक ऋषी यांची आरती झाल्यानंतर सकाळी नऊ वाजता मंडलापूर येथील समस्त कोळी बांधव व विविध मान्यवरांच्या उपस्थितीत ध्वजारोहणाचा कार्यक्रम पार पडला आहे. ध्वजारोहण झाल्यानंतर लगेचच महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. मंडलापुर येथे महर्षी वाल्मीक ऋषी यांची एक आगळीवेगळी जयंती साजरी करण्यात आली असून हार तुरे व डी.जे.वर बेकार खर्च न करता जयंतीनिमित्त संपूर्ण मंडलापुर वाशीयांना महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. मंडलापुर येथील आद्यकवी महर्षी वाल्मीक ऋषी जयंती महाप्रसाद वाटप करून साजरा करण्यात आल्याने या जयंतीची सर्वत्र चांगली चर्चा होताना दिसून येत आहे.

# टायगर ग्रुपची शिकवण देशातील युवकांसाठी दिशादर्शक - समाधान सावंत

**जळगाव : (समर्थ गांवकरी)**

टायगर ग्रुपचे धरणगाव तालुका उपाध्यक्ष शहेबाज शाह यांच्या वाढदिवसानिमित्त काल वनकुटे येथील सहवास मतिमंद मुलांची निवासी संस्था येथील मतिमंद मुलांसोबत केक कापून व दिवाळी फराळ वाटप करून वाढदिवस साजरा करण्यात आला. या उपक्रमाचे आयोजन टायगर ग्रुपचे संस्थापक वस्ताद जालिंदर जाधव, अध्यक्ष डॉ तानाजी जाधव, सागर कांबळे तसेच खान्देश विभाग अध्यक्ष ऋषीकेश भांडारकर, यांच्या विशेष मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. शहेबाज शाह व पदाधिकाऱ्यांनी मतिमंद मुलांसोबत केक कापून व दिवाळी फराळ वाटप करून वाढदिवस साजरा केला. यावेळी सहवास मतिमंद मुलांच्या संस्थेचे संस्थापक समाधान सावंत यांनी शुभेच्छा देताना सांगितले की, "आपण वाढदिवस साजरा करण्यासाठी इथपर्यंत आलात हीच फार मोठी गोष्ट आहे. कारण या संस्थेत राहणारी मतिमंद असणारी लेकरं ही समाजातील वंचित व दुर्लक्षित घटक म्हणून ओळखली जातात. शासनाचे देखील या घटकाकडे फारसं लक्ष नसतं. त्यांचे पालक देखील या लेकरांकडे लक्ष देण्यास फारसे तत्पर नसतात. संस्थेत असणारी काही मुलं ही अनाथ आहेत तर काहींचे आई-वडील फार म्हातारे झालेले आहेत. शासनाचं कुठलंही




अनुदान या संस्थेला नसतांना टायगर ग्रुपचे पदाधिकारी या ठिकाणी येऊन या दुर्लक्षित घटकांसोबत वाढदिवस साजरा करतात हेच आम्ही या संस्थेसाठी अनुदान समजतो व हीच भव्य दिव्य गोष्ट आमच्यासाठी आहे" या संस्थेचे संस्थापक समाधान सावंत पुढे म्हणाले की, "विशेष म्हणजे आपला असणारा वेळ कुणासाठी तरी देणे ही फार मोठी गोष्ट असते. टायगर ग्रुप चे हे नवयुवक आपला वाढदिवस पार्ट्या करून साजरा करू शकत होते परंतु त्यांनी असे काहीही न करता त्यांचा अमूल्य वेळ या समाजातील दुर्लक्षित घटकांसाठी देऊन व त्यांच्यासोबत केक कापून व दिवाळी फराळ वाटप करून वाढदिवस साजरा केला ही प्रचंड अभिमानाची बाब आहे. त्यांच्या ग्रुपची ही शिकवण देशातील युवकांना दिशादर्शक ठरणारी आहे." संस्थेच्या वतीने समाधान सावंत यांनी टायगर ग्रुपच्या स्तुत्य उपक्रमाचे कौतुक करत शाहेबाज शहा यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. या उपक्रमाबद्दल टायगर ग्रुपचे खान्देश विभाग अध्यक्ष ऋषीकेश भांडारकर यांनी धरणगाव तालुका उपाध्यक्ष शहेबाज शहा व त्यांच्या संपूर्ण टीमचे विशेष कौतुक केले. त्यांनी सांगितले की, "आजच्या काळात अनेक तरुण वाढदिवस मोठ्या पार्ट्या, मिरवणुका किंवा तलवारीने केक कापून साजरे करताना दिसतात. परंतु टायगर ग्रुपचे पदाधिकारी आणि सदस्य मात्र मतिमंद मुलं, अनाथ आश्रमातील मुले आणि वृद्धाश्रमातील ज्येष्ठांसोबत आपले वाढदिवस साजरे करतात, हीच आमच्या ग्रुपची खरी ओळख आणि शिकवण आहे. समाजातील दुर्लक्षित घटकांसाठी वेळ देणं हीच खरी मानवसेवा आहे." भांडारकर पुढे म्हणाले की, "शहेबाज शहा व त्यांची संपूर्ण टीम धरणगाव तालुक्यात एक चांगल्या प्रकारचं समाजकार्य करत आहे, आणि टायगर ग्रुप त्यांच्या पाठीशी सदैव ठामपणे उभा राहील."

यावेळी टायगर ग्रुपचे धरणगाव तालुका संपर्कप्रमुख भूषण महाजन, चेतन पाटील, कृष्णा सुतार, कय्यूम शाह, इमराणा शहा, निजाम भाई आदी टायगर ग्रुपचे सदस्य उपस्थित होते.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, न्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# माळशेज खोऱ्यात काकडा आणि काकड आरतीचा उत्साह

**जुन्नर तालुका :** (समर्थ गांवकरी)

माळशेज खोऱ्यातील उदापुर,ओतूर,खामुंडी,पिंपरी पेंढार,आळे,राजुरी,बेल्हा,आणे, नळावणे,पाचघर चिल्हेवाडी, कोपरे,मांडवे,मुथाळणे,डिंगोरे, पिंपळगाव जोगा,कोळवाडी, पांगरी,मढ,पारगाव,तळेरान, खिरेश्वर सह सर्व आदिवासी भागातील वाड्यावस्त्यांवर आणि गावांमधील मंदिरांमध्ये पहाटे पासूनच काकड्याचे अभंग व काकड आरतीचे मंगलमय सूर कानी पडत आहेत.



गावातील वारकरी संप्रदायातील ज्येष्ठ मंडळी आणि त्यांना महिला तरुणांची असणारी साथ हे एकत्र जमून पांडुरंगाचा काकडा पहाटे पाच वाजता च सुरू करतात.गावातील युवक- युवती, सुवासिनी घरून देवाला औक्षण करण्यासाठी हातामध्ये आरतीचे तबक घेऊन मंदिरात येतात.काकडा भजनाच्या सुरुवा तीला देवाच्या रूपाचे अभंग म्हटले जातात.यामध्ये एकूण सात मालिका गायिल्या जातात. त्यात मंगला चरणाचा भाग एक, दोन,तीन,काकडा आरती,अभंग, भूपाळ्या,वासुदेव,जोगी,आंधळे पांगुळ,बहिरा मुका,नाट गौळणी असा नित्यक्रम गुरुवर्य कोंडाजी बाबा डेरे यांनी घालून दिलेला आहे.तो वारकरी नित्यनेमाने आजही पाळतात.

दही,दूध,मध,साखर यांनी अभिषेक करून देवांना उष्ण पाण्याने स्नान घातले जाते. देवालापोशाख परिधान केल्या नंतर अलंकार पूजा आणि हार अर्पण केले जातात.नंतर पेढे, सुकामेवा,विविध फळे,दूध दही मिश्रीत लाही,साखर फुटाणे, पुरणपोळीचा महानैवेद्य दाखविल्यानंतर आरती आणि पसायदान होत असल्याची माहिती ह.भ.प.बाबुराव भास्कर यांनी दिली.या काकडा कार्यक्रम प्रसंगी धाकटे शिंदे मंडळाचे अध्यक्ष लक्ष्मण शिंदे,माळी मंडळाचे सल्लागार मुरलीधर भास्कर,पुजारी बाबुराव भास्कर, चंद्रकांत शिंदे,शंकर शिंदे,हनुमंत शिंदे,सखाराम भगत,तानाजी पोटकुले,मारुती शिंदे,रामदास भगत, रामदास चौधरी यांच्यासह अनेक महिला वारकरी पहाटेच्या काकड्याला उपस्थित असतात.



नगरमधील तोफखाना तरुण मंडळाला मनपा ने घेतलेल्या गणेशोत्सव देखावे स्पर्धेत वनवासातील सीता या जिवंत देखाव्याला सोशल मीडिया व आधुनिक तंत्रज्ञान गटांमध्ये पारितोषिक सहाय्यक आयुक्त सपना वसावा यांच्या हस्तेते देण्यात आले. यावेळी त्याचा स्वीकार सुशांत जाधव व कार्यकर्त्यांनी केला समवेत,मेहेर लहारे,लेखाधिकारी गणेश लयचेट्टी ,प्रसिध्दी व सांस्कृतिक विभाग प्रमुख .शशिकांत नजन,क्रीडा विभाग प्रमुख व्हिन्सेंट फिलिप्स ,परीक्षक श्रेणिक शिंगवी ,संदीप जाधव (फोटो-महेश कांबळे)

## थोडक्यात बातम्या...



### घोटी बाजार समितीत बैल बाजाराचे उदघाटन

इगतपुरी (स. गांवकरी) : धनत्रयोदशीच्या शुभ मुहूर्तावर घोटी येथे शेतकऱ्यांच्या वतीने शेतकरी संघटना संघ इगतपुरी तालुक्याच्या वतीने तालुक्यातील महत्वाची बाजार पेठ असलेल्या घोटी बाजार समिती च्या आवारातील बैल बाजारात बैल बाजाराचे उदघाटन करण्यात आले आहे. तालुक्यासह नाशिक व नगर जिल्ह्यातील शेतकरी बैल घेऊन बाजारासाठी येत असतात त्याचप्रमाणे यावेळी बैलाच्या कानावर टॅग असेल तरच बैल खरेदी विक्री करता येणार असून त्या प्रमाणेचे खरेदी विक्री करता येईल अशा सूचना शेतकरी संघ इगतपुरी च्या वतीने देण्यात आल्या आहेत. दरम्यान शनिवारच्या दिवशी बैल बाजारचा नारळ फोडून पशुवैद्यकीय अधिकारी डॉ के एम देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी माजी उपसरपंच राजेंद्र पाटील जाधव, प्रगतशील शेतकरी रामदास गव्हाणे, किसान सेना शिंदे गट तालुकाप्रमुख अंकुश कड्डू, कैलास भगत, गंगाराम कडु, विठोबा कडु, वासुदेव भोर, उत्तम लहाने, मुरलीधर दूभाषे देविदास लंगडे, सुरेश जाधव, पांडुरंग आरशेंडे आदीसर्व शेतकरी मोठया संख्येने उपस्थित होते.

### दिवाळी स्पेशल नांदेड - हडपसर विशेष दोन रेल्वे गाड्या धावणार



नांदेड (स. गांवकरी) : भारतीय संस्कृतीतील सर्वात मोठा सण म्हणून ओळखल्या जाणाऱ्या दिवाळी सणाला आपल्या गावाकडे जाऊन आनंद उत्सव साजरा करता यावा या अनुषंगाने प्रवाशांची गैरसोय होऊ नये म्हणून नांदेड- हडपसर या मार्गावर विशेष रेल्वे गाड्या सोडावेत अशी मागणी खा. डॉ. अजित गोपछडे यांनी केंद्रीय रेल्वे मंत्र्यांकडे केली होती. या मागणीला यश आले असून नांदेड हडपसर या दोन विशेष रेल्वे गाड्या सोडण्यात येणार आहेत. दिवाळीनिमित्त होणारी रेल्वे प्रवाशांची गर्दी लक्षात घेऊन दक्षिण मध्ये रेल्वेने नांदेड हडपसर नांदेड विशेष गाडी लातूर मार्गे चालविण्याचे जाहीर केले आहे. यासाठी खा.डॉ. अजित गोपछडे यांनी यशस्वी पाठपुरावा केला आहे. नांदेडसह मराठवाड्यातील लाखो कर्मचारी, कामगार ,विद्यार्थी ,व्यापारी पुणे आणि पुणे परिसरात वास्तव्यास आहेत. परंतु दिवाळी सण साजरा करण्यासाठी ही सर्व मंडळी आपापल्या गावाकडे येत असतात. पुणे येथून नांदेड अथवा मराठवाड्यात येण्यासाठी खाजगी वाहनाने प्रवास करणे आर्थिक दृष्ट्या खर्चिक आणि जिकीरीचे असल्याने या प्रवाशांना सुखरूप प्रवास करता यावा यासाठी नांदेड - हडपसर या मार्गावर विशेष रेल्वे गाड्या सोडाव्यात अशी मागणी खा. डॉ. अजित गोपछडे यांनी केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे केली होती. या मागणीचा सकारात्मक विचार करत केंद्रीय रेल्वेमंत्र्याने नांदेड - हडपसर या मार्गावर रेल्वेच्या दोन विशेष गाड्या सोडत या गाड्यांच्या चार फेऱ्या करण्याचे आदेशित केले आहे. त्यानुसार गाडी क्रमांक 07607 हुजूर साहेब नांदेड ते हडपसर विशेष गाडी दिनांक 21 ऑक्टोबर आणि 28 ऑक्टोबर रोजी नांदेड रेल्वे स्थानकावरून सकाळी 8 वाजून 30 मिनिटांनी सुटेल . सदर रेल्वे पूर्णा - परभणी -गंगाखेड- परळी -लातूर रोड- लातूर -धाराशिव -बार्शी शहर- कुरूडवाडी - दौंड मार्गे हडपसर येथे रात्री नऊ वाजून 40 मिनिटाला पोहोचेल. परतीच्या प्रवासात 7608 ही हडपसर ते हुजूर साहेब नांदेड विशेष गाडी दिनांक 21 ऑक्टोबर आणि दिनांक 28 ऑक्टोबर रोजी मंगळवारी हडपसर रेल्वे स्थानकावरून रात्री 10 वाजून 50 मिनिटाला सुटणार असून ती दौंड- लातूर -परळी - परभणी मार्गे हुजूर साहेब नांदेड येथे दुसऱ्या दिवशी दुपारी 12 वाजून 15 मिनिटाला पोहोचणार आहे . या गाडीला एकूण 22 डबे असणार आहेत . त्यामुळे पुणे येथून नांदेडकडे आणि मराठवाड्यात येणाऱ्या सर्व रेल्वे प्रवाशांना आणि दिवाळी साजरी करणाऱ्या बांधवांना खा. डॉ. अजित यांच्या प्रयत्नामुळे दिवाळीच्या प्रवासाचा गोड आनंद घेता येणार आहे.

### शिवशक्ती रिक्षा युनियन कडून रिक्षा चालकांना जीवनांवश्यक वस्तूचे वाटप



ठाणे (स. गांवकरी) : दिव्यात शिवशक्ती रिक्षा युनियनच्या वतीने यंदा रिक्षा चालक मालक यांना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले व दीपावलीच्या शुभेच्छा देऊन अध्यक्ष विनोद भगत व श्रीराम भगत यांच्या हस्ते वाटप करण्यात आले. शिवशक्ती रिक्षा युनियनच्या वतीने दरवर्षी रिक्षा चालक व मालक यांच्यासाठी अनेक उपक्रम राबविले जातात तसेच रिक्षा चालकांच्या आरोग्याची देखील काळजी घेत युनियनच्या माध्यमातून आरोग्य शिबीरे व इतर तपासण्याचे आयोजन करण्यात येते. दिवा शहरातील रिक्षा चालक हा कधीही एकाकी पडणार नाही व युनियन नेहमी त्यांच्या पाठीशी उभी राहिली असून युनियनच्या माध्यमातून त्यांना अनेक संधी भविष्यात उपलब्ध करून देण्याचा आमचा मानस आहे असे अध्यक्ष विनोद भगत यांनी बोलताना स्पष्ट केले. प्रसंगी शिवशक्ती रिक्षा युनियनचे खजिनदार प्रवीण बार्शीकर, श्रीराम भगत तसेच शेकडो रिक्षा चालक व मालक उपस्थित होते.

# नायगाव तहसीलसमोर 'विषाची बाटली' घेऊन वाळूच्या हायवा मालकाचा राडा!

**तहसीलदार-दलालांच्या व्यवहाराचा व्हिडिओ व्हायरल**

**नायगाव :** (समर्थ गांवकरी)

नायगाव तालुक्यातील बरबडा सर्कल अंतर्गत व लोहा गोदावरी नदीच्या पात्रातून येणाऱ्या तालुक्यातील नायगाव तहसील कार्यालयासमोर शनिवारी दुपारी नाट्यमय घटना घडली. अवैध वाळू पुरवठा करणाऱ्या परमेश्वर हंबर्डे या हायवा-टिपर मालकाने तहसीलदार व दलालांकडून हप्त्याच्या नावाखाली घेतलेले दीड लाख रुपये असूनही गाडी सोडण्यात आली नाही, असा आरोप करत तहसील कार्यालयासमोर विषारी औषधाची बाटली घेऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न शनिवारी दुपारी केला.या प्रकाराने नायगाव तालुक्यात खळबळ उडाली .



या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर काही क्षणातच व्हायरल झाल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. नायगाव पोलिस ठाण्याचे अधिकारी आणि नायब तहसीलदार विजय येरवाड यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत मध्यस्थी केल्याने प्रसंग मोठा अनर्थ टळला.

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित हायवा मालकाकडून नायगाव तहसील कार्यालयातील काही कर्मचाऱ्यांनी आणि तहसील कार्यालयात कार्यरत असलेले पण नायगाव तहसील परिसरातील वाळू व्यवहारात करणारे कर्मचारी शिपाई यांनी हप्त्याच्या स्वरूपात मोठी रक्कम घेतली होती.

त्यानंतर तडजोडीचे दीड लाख रुपये देऊनही संबंधित वाहन सोडण्यात आले नसल्याने संतप्त मालकाने कार्यालयासमोर आत्महत्येचा इशारा देत राडा घातला.

घटनेदरम्यान कार्यालयाबाहेर मोठी गर्दी जमली होती. काही लोकांनी त्याचे व्हिडिओ मोबाईलमध्ये चित्रीत करून सोशल मीडियावर पोस्ट केले, जे काही तासांतच वायरल झाले.हे कळताच सामाजिक कार्यकर्त्या सोनाली ताई हंबर्डे यांनी धाव घेऊन या प्रकरणात हायवा मालकाचे मत परिवर्तन केले.

या प्रकरणानंतर तहसीलदार कार्यालयातील 'दलालीचा कारभार' उघड झाल्याची चर्चा सर्वत्र सुरू आहे. या घटनेतील व्हिडिओच्या आधारे तहसीलदार, संबंधित तहसीलचा काही तलाठी ,आदी आणि इतर कर्मचाऱ्यांवर गुन्हा दाखल होणार की तडजोड करून वाहन सोडून देणार, याबाबत नायगाव परिसरात जोरदार चर्चा रंगली आहे.

सामाजिक कार्यकर्त्या सोनाली ताई हंबर्डे व स्थानिक नागरिकांनी प्रशासनाकडे अवैध वाळू व्यवसायातील हप्तेखोरी व दलालीचा सखोल तपास करून या मध्ये मळून असलेल्या दोषी अधिकारी व कार्यकर्ते यांच्या सारख्या दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

या विषयी अधिकची माहिती घेतली असता दोन वाळूने भरलेल्या हायवा कुंटूर पोलिस ठाण्यात लावल्या असून गुन्हा दाखल करण्याचा प्रकार चालू असल्याचे कुंटूर पोलिस ठाण्याचे सपोनि विशाल भोसले यांनी भ्रमणध्वनीवरून सांगितले अधिकची माहिती गुन्हा दाखल प्रतिक्रिया चालू आहे असे सांगितले.

## मुंब्रा पोलीस स्टेशनचा नागरिकांना जागरूकतेचा संदेश

**ठाणे :** (समर्थ गांवकरी)

ठाणे शहर पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे यांच्या मार्गदर्शनाखाली मुंब्रा पोलीस स्टेशनने दिवाळी निमित्त कंदील आणि दिव्यांच्या माध्यमातून नागरिकांपर्यंत जागरूकतेचा संदेश पोहोचवण्याचा अद्वितीय उपक्रम राबवला असून वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल शिंदे यांच्या नेतृत्वाखाली 'ठाणे जिल्हा कायद्याचा बालेकिल्ला', 'निर्भय ठाणे', 'नशा मुक्त ठाणे', 'बॅनर मुक्त ठाणे' प्रदूषण मुक्त ठाणे अशा संदेशांनी शहरात दिवे लावले जात असून नागरिकांनी या मोहिमेचे उत्साहाने स्वागत केले आहे आणि यामुळे पोलिस व नागरिक यांच्यातील संबंध अधिक दृढ झाले असून मुंब्रा पोलीस स्टेशन ठाणे शहर पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीतील उत्कृष्ट पोलीस स्टेशन ठरत आहे. नागरिकांना कायद्याचे पालन करण्याची जबाबदारी स्वीकारावी, सुरक्षिततेसाठी नियम पाळावेत, महिला व मुलांची सुरक्षा सुनिश्चित करावी, सार्वजनिक स्वच्छता राखावी, वाहतूक नियमांचे पालन करावे, सण साजरे करताना जबाबदारीने वर्तन करावे, अपघात व गुन्हे टाळावेत, फटाके व धुमधडाका टाळावां.

## स्वर्गीय शिवाजी कर्डिले यांच्या कुटुंबीयांचे मुख्यमंत्र्यांनी केले सांत्वन

- ग्रामीण अर्थकारणाची उत्तम जाण असलेला नेता हरपला - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**अहिल्यानगर :** (समर्थ गांवकरी)

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आमदार स्वर्गीय शिवाजी कर्डिले यांच्या बुऱ्हाणनगर येथील निवासस्थानी त्यांच्या कुटुंबीयांची भेट घेत सांत्वन केले. त्यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून श्रद्धांजली वाहिली. मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी स्वर्गीय शिवाजी कर्डिले यांचा मुलगा अक्षय, जावई आमदार संग्राम जगताप व कुटुंबातील इतर सदस्यांना धीर देत सांत्वन केले. याप्रसंगी विधान परिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे,



जलसंपदा मंत्री (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ.राधाकृष्ण विखे पाटील, पणन व राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल, खासदार मेधा कुलकर्णी, आमदार संग्राम जगताप, आमदार मोनिका राजळे,आमदार विक्रमसिंह पाचपुते, आमदार विठ्ठल लंघे, आमदार राहुल कुल, पद्मश्री पोपट पवार, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी आदी उपस्थित होते. माध्यमांशी बोलताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, स्वर्गीय शिवाजीराव कर्डीले हे सहकार, शेती व ग्रामीण अर्थकारणाची उत्तम जाण असलेले, तसेच ग्रामीण भागाशी घट्ट नाळ जोडलेले व्यक्तिमत्त्व होते. सामान्य जनतेच्या सुखदुःखात सदैव सहभागी राहणारे, व्यापक जनसंपर्क असणारे व विचारांची स्पष्टता जपणारे सर्वसामान्यांच्या माणूस म्हणून त्यांनी आपली ओळख निर्माण केली. त्यांच्या अचानक जाण्याने त्यांच्या कुटुंबासह संपूर्ण जिल्हावासियांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे आपल्या कष्ट, चिकाटी व संघर्षाच्या जोरावर त्यांनी कारकीर्द घडवली. समाजकारण, राजकारण करत असताना अनेक अडचणींना तोंड देत त्यांनी लोकांचा विश्वास संपादन केला.

## श्री शिव छत्रपती महाविद्यालयात भारतीय संविधान जागृती कार्य शाळा संपन्न

**जुन्नर तालुका :** (समर्थ गांवकरी)

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने जुन्नर येथील श्री शिव छत्रपती महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना (युनिट क्र. बी-०३१) विभागाच्या वतीने दिनांक १६ ऑक्टोबर २०२५ रोजी "भारतीय संविधान जागृती या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.हा कार्यक्रम भारतीय संविधान अमृत महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित करण्यात आल्याची माहिती कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात कार्यक्रमअधिकारी डॉ.महेंद्र कोरडे यांनी दिली.



महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने भारतीय संविधान अमृत महोत्सवानिमित्त जुन्नर शहरात संविधान जागृती रॅलीद्वारे कार्यशाळेची सुरुवात झाली. संविधान जागृती साठी कृषी उत्पन्न बाजार समिती आवारात स्वयंसेवकांनी संविधानाचे महत्व व लोकशाही यावर भाष्यकरणारे पथनाट्य सादर करत लोकांमध्ये संविधान जागृती साठी प्रयत्न केला. "संविधान जागृती" कार्यशाळेचे उद्घाटन जुन्नर तालुका शिवनेर शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष निवृत्ती काळे यांनी केले.उद्घाटन प्रसंगी बोलताना भारतीय संविधान हे केवळ एक दस्तऐवज नाही तर देशाच्या आत्म्याचे प्रतिबिंब आहे.आपले संविधान केवळ मूलभूत अधिकारच देत नाही तर मूलभूत कर्तव्यांची जाणीवही करून देते असे प्रतिपादन केले. या कार्य शाळेत प्रमुख व्याख्याते म्हणून प्रा.नारायण देशपांडे यांनी संविधानाचा ऐतिहासिक आढावा घेतला.संविधान समजून सांगताना त्यांनी आपल्या प्रभावी व्याख्यानात ७५ वर्षांपूर्वी पासून चा इतिहास विद्यार्थ्यांपुढे मांडला १९४६ मध्ये मसुदा समितीची स्थापना,समितीच्या बैठका व बैठकीत मांडले गेलेले विविध अभ्यासकांचे विचार यांचा सविस्तर आढावा त्यांनी घेतला.

## सामुदायिक गोपूजन सोहळ्याचे उत्साहात आयोजन!

**कोतुळ :** (समर्थ गांवकरी)

अकोले तालुक्यातील कोतुळ गावात दरवर्षीप्रमाणे याही वर्षी दिवाळीच्या प्रारंभानिमित्त सादर वसुबारस सण मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावाने साजरा करण्यात आला. या निमित्ताने जय भवानी सांस्कृतिक संवर्धन मंडळ, श्री वरदविनायक देवस्थान तसेच खटपट नाका मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने सामुदायिक गोपूजन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. भारतीय संस्कृतीत दीपावली सणाची सुरुवात गोपूजनाने करण्याची परंपरा प्राचीन काळापासून आहे. हिंदू धर्मात गोमातेचे प्रथम पूजन केल्याशिवाय कोणतेही दैव किंवा पितृ कार्य पूर्ण मानले जात नाही. त्यामुळे गोमातेबद्दल समाजात अपार श्रद्धा असून तिच्या पूजनाने सकारात्मक ऊर्जेचा संचार होतो, असा विश्वास आहे. वरदविनायक मंदिराच्या आवारात पार पडलेल्या या सोहळ्यात गावातील गाई, त्यांचे पालन करणारे शेतकरी, तसेच महिला भगिनींचा मोठ्या प्रमाणात सहभाग होता. धार्मिक वातावरणात पारंपरिक वाद्यांचा गजर, मंत्रोच्चार आणि भाविकांच्या जयघोषांनी परिसर दुमदुमून गेला होता.

# समर्थ शैक्षणिक संकलात माजी शिक्षक कृतज्ञता सोहळा उत्साहात संपन्न

**जुन्नर तालुका :** (समर्थ गांवकरी)

समर्थ रूरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित समर्थ शैक्षणिक संकुल बेल्हे येथे नुकताच "माजी शिक्षक कृतज्ञता सोहळा" मोठ्या उत्साहात संपन्न झाला.आपल्या सेवाकाळामध्ये शिक्षकांनी सुसंस्कृत पिढीनिर्माण करण्याचं काम केलं अशा शिक्षकांप्रती आदरभाव व्यक्त करण्यासाठी सेवानिवृत्त शिक्षकां चा सन्मान सोहळा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे उद्घाटन दीपप्रज्वलन व सरस्वती पूजनाने करण्यात आले. प्रास्ताविकामध्ये माजी शिक्षकांप्रती कृतज्ञता भाव व्यक्त करताना संस्थेचे विश्वस्त वल्लभ शेळके म्हणाले,शिक्षक म्हणजे



समाज घडविणारा महत्त्वाचा घटक आहे.शिक्षण क्षेत्रात कार्य करताना शिक्षक विद्यार्थ्यांना ज्ञान,संस्कार आणि मूल्यांचा वारसा देतात तसेच,सेवेत असताना जसे शिक्षक समाजा साठी कार्य करतात तसेच सेवानिवृत्तीनंतरही आपले आरोग्य,मानसिक संतुलन आणि सक्रिय जीवनशैली टिकविणे गरजेचे आहे.आरोग्य चांगले ठेवले तर आपण समाजा साठी आणि पुढील पिढीसाठी मार्गदर्शक म्हणून कार्य करत राहू शकतो. या प्रसंगी माजी शिक्षकांचा शाल,श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमासाठी मार्गदर्शन करण्यासाठी सावित्री बाई फुले पुणे विद्यापीठाच्या बहि:शाल विभागाचेव्याख्याते व जुन्नर येथील प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकार डॉ.दिलीप कचरे उपस्थित होते.

सेवानिवृत्ती नंतर आपले आरोग्य उत्तम आणि सुदृढ राहण्यासाठी नियमितपणे व्यायाम,संतुलित आहार,पुरेसे पाणी,झोप,मेडिटेशन या पाच घटकांची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी उपस्थितांना वेगवेगळ्या व्यायाम प्रकाराचे प्रात्यक्षिकही करून दाखविले. माजी शिक्षकांनीदेखील यावेळी आपल्या मनोगतातून त्यांच्या प्रति आदरयुक्त भावनेने संपन्न झालेल्या या कृतज्ञता सोहळ्याचे धन्यवाद व्यक्त केले. या कार्यक्रमासाठी माजी जिल्हा परिषद सदस्या स्नेहल शेळके,समर्थ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंटचे प्राचार्य डॉ.नवनाथ नरवडे,समर्थ कॉलेज ऑफ कॉम्प्युटर सायन्स महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.उत्तम शेलार,डॉ.लक्ष्मण घोलप,क्रीडा संचालक हरिश्चंद्र नरसुडे,राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा.भूषण दिघे प्रा. गणेश बोरचटे,प्रा.दिनेश जाधव उपस्थित होते.त्याचप्रमाणे काशिनाथ लामखडे,शंकर गोफने,गंगाराम वाळुंज,देवराम साळवे,अनंत आहेर, कुशाबा हांडे, हरी आहेर, हनुमंत दाते,सुनील सासवडे, अशोक विश्वासराव, मुरलीधर आहेर, मंदाकिनी घंगाळे,बबन घंगाळे, पांडुरंग औटी,बाबासाहेब पवार, दत्तात्रय गवळी,बबन पिंगट, विठ्ठल कोकणे,रामभाऊ सातपुते गुरुजी व परिसरातील सेवानिवृत्त शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संस्थेचे अध्यक्ष वसंत शेळके उपाध्यक्ष माऊली शेळके, सचिव विवेक शेळके यांनी सर्व माजी शिक्षकांना उत्तम आरोग्याच्या शुभेच्छा दिल्या.प्रशासकीय अधिकारी प्रा.प्रदीप गाडेकर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले,तर डॉ.शरद पारखे यांनी सर्वांचे आभार मानले.

# लोहगाव जि.प. गटासाठी भाजपाकडून महेश हांडे इच्छुक



**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

बिलोली तालुक्यातील लोहगांव जिल्हा परिषद गट हे सर्वसाधारणसाठी सुटले आहे. या गटात इच्छुक उमेदवारांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. 'मी पुन्हा येईन' चा नारा देत माजी सदस्यांनीही तयारी सुरू केली आहे.पण यावेळी या गटातून भाजपकडून संधी मिळाल्यास या संधीचं सोन करू, निष्ठावंत कार्यकर्ते तथा अंजनीचे आदर्श सरपंच व शिवा संघटनेचे तालुका अध्येक्ष महेश हांडे यांनी अशी इच्छा दर्शवली आहे.

राज्यातल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका दिवाळीनंतर सुरु होणार असून ती पुढच्या वर्षी जानेवारी महिन्यात पूर्ण होण्याची शक्यता आहे. नांदेड जिल्हा परिषदचे अध्यक्षपद ओबीसी महिलांसाठी आरक्षित असल्याने ज्यात्या पक्षच्या मोर्चे बांधणीला सुरुवात झाली आहे. दि. १३ ऑक्टोबर रोजी जि. प. गटाचे व गणाचे सदस्य निहाय आरक्षण जाहीर होताच निष्ठावंतानी पक्षश्रेष्ठींकडे तिकीट मागणीला धावपळ सुरु केली आहे. असे असलेतरी सद्यस्थित समीकरणे बदललेली असून नव्या उमेदीच वातावरण निर्माण झाले आहे. म्हणून मतदार आता आजी, माजीला सोडून नव्या चेहऱ्यांना संधी देणार असल्याच्या चर्चा रंगत आहेत. गतवर्षी लोहगाव गट हा (ओबीसी) साठी राखीव असल्याने त्यावेळी काँग्रेसचे संजय बेळगे निवडून आले होते. या गटात यंदा आजी,माजीने तयारी दर्शवली असलीतरी यावेळी अंजनीचे गावचे तरुण तडफदार सरपंच, तथा सरपंच संघटना व शिवा संघटनेचे तालुकाध्यक्ष परिसरातील युवा नेतृत्व समजल्या जाणारे निष्ठावंत भाजपचे कार्यकर्ते खासदार अजित गोपछडे यांचे खांदे समर्थक महेश हांडे यांना जर या गटातून भाजपाने संधी दिली. त्या संधीचे सोन करणार असल्याची इच्छा हांडे यांनी व्यक्त केली. गेल्या अनेक वर्षापासून संघटनात्मक कामातून स्वतःची ओळख निर्माण केली आहे. ग्रामीण भागातील युवकांसाठी शिक्षण, आरोग्य, स्वच्छता, तसेच शेतकरी व महिलांच्या हक्कांसाठी त्यांनी सातत्याने आवाज उठवला आहे. सामाजिक बांधिलकीची जाण आणि जनतेशी दांडगा संपर्क ही त्यांची जमेची बाजू मानली जाते.लोहगाव परिसरात त्यांनी, विद्यार्थिनींसाठी मार्गदर्शन शिबिरे, तसेच जलसंवर्धन व पर्यावरण जनजागृतीसारखे विविध उपक्रम राबवले आहेत. त्यांच्या या कार्यामुळे त्या स्थानिक पातळीवर लोकप्रिय झाले असून, पक्षातील कार्यकर्त्यांमध्ये त्यांच्याबद्दल सकारात्मक वातावरण आहे.यामुळे लोहगांव गटातून जि.प. सदस्य पदासाठी निवडणूक लढवण्यासाठी तयारी दर्शवली आहे.



अहिल्यानगर : राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी बुऱ्हाणनगर येथे आमदार स्वर्गीय शिवाजीराव कर्डिले यांच्या निवासस्थानी भेट देऊन त्यांच्या कुटुंबीयांचे सांत्वन केले. महसूलमंत्री श्री. बावनकुळे यांनी स्व. कर्डिले यांचे सुपुत्र अक्षय कर्डिले, आमदार संग्राम जगताप तसेच कुटुंबातील इतर सदस्यांना धीर देत त्यांचे सांत्वन केले. यावेळी त्यांनी स्व. शिवाजी कर्डिले यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून श्रद्धांजली वाहिली. याप्रसंगी माजी आमदार स्नेहलता कोल्हे, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

## थोडक्यात बातम्या...



### पर्यावरण पूरक दिपावलीची प्रतिज्ञा; आश्रमशाळा ढवळयुरीचा उपक्रम

पारनेर (स. गांवकरी) : दिवसेंदिवस प्रदूषणाची वाढत चाललेली समस्या तसेच दिपावलीच्या काळात त्यात होणारी वाढ, यामुळे मानवासह व सजीवांना होणारा त्रास याबाबतीत विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती व्हावी म्हणून प्राथमिक आश्रमशाळा ढवळपुरी, तालुका पारनेर या ठिकाणी विद्यार्थ्यांनी फटाके मुक्त व पर्यावरण पूरक दीपावलीची प्रतिज्ञा घेतली. मागील १४ वर्षांपासून राष्ट्रीय हरित सेनेअंतर्गत हा उपक्रम प्राथमिक आश्रमशाळेत राबविला जात आहे. याप्रसंगी मुख्याध्यापक संदीप महांडुळे यांनी सांगितले की, दिपावली हा दिपोत्सव असून अंधारावर प्रकाशाचा विजय. परंतु दिपावली प्रसंगी संपूर्ण देशामध्ये मोठ्या प्रमाणात फटाके उडवून ध्वनी प्रदूषण व वायू प्रदूषणात वाढ होत असते. म्हणून विद्यार्थ्यांनी फटाकेमुक्त व पर्यावरण पूरक दीपावली साजरी करावी. राष्ट्रीय हरित सेना योजना प्रमुख शिक्षक लतीफ राजे यांनी विद्यार्थ्यांना दीपावलीच्या काळात होणाऱ्या ध्वनी प्रदूषण, वायू प्रदूषणाची माहिती देऊन त्याबाबत जागृती निर्माण केली तसेच विद्यार्थ्यांना फटाके मुक्त दीपावलीची प्रतिज्ञा दिली. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी देखील आपण कमीत कमी फटाके उडवून पर्यावरण पूरक दीपावली साजरी करू तसेच दीपावली मध्ये फटाके न घेतल्यामुळे शिल्लक राहिलेल्या पैशांची बचत बँक तयार करून पैशाची बचत करू असेही सांगितले. यावेळी शिक्षक वसंत काळे, मनीषा गर्जे, रशिदा तांबोळी, संगीता मोरे, संतोष पट्टेकर, राजाराम वाघ, देवका पायमोडे, प्रशांत पादीर, अमोल बांगर,भावना बेरड, सोनाली नारायणी, कृष्णा धुमाळ, आप्पासाहेब वाबळे, समाधान भुसारे, गणेश लाकूडझोडे, सुरेंद्र पाटील, संदीप जाटे, सनी काळे, रभाजी भागवत, सुरजसिंग वाणी, विठ्ठल बाचकर, आदी उपस्थित होते.

### चांडोली खुर्द येथे शेतात सापडले दुर्मिळ जातीचे ऊद मांजर

मंचर (स. गांवकरी) : चांडोली खुर्द (ता. आंबेगाव) येथे माजी उपसरपंच संदीप वाबळे यांच्या शेतात दुर्मिळ जातीचे ऊद मांजर सापडल्याने परिसरात एकच उत्सुकता निर्माण झाली आहे. शेतकरी वाबळे हे शनिवारी आपल्या शेतात पाणी भरत असताना अचानक पाण्यात हालचाल जाणवली. त्यांनी पाहिले असता लहान आकाराचे, राखाडी तपकिरी रंगाचे ऊद मांजर दिसून आले. तत्काळ त्यांनी वन विभागाच्या अधिकारी सोनल भालेराव यांना याबाबत माहिती दिली. त्यांनी तातडीने वनरक्षक पोखरकर यांना घटनास्थळी पाठवून ऊद मांजर सुरक्षितपणे ताब्यात घेतले. त्यानंतर वन विभागाच्या टीमने त्या मांजराला उपचारासाठी तातडीने वन्यजीव रुग्णालयात हलविले. ऊद मांजर हे अत्यंत दुर्मिळ आणि संरक्षित प्रजातीतील प्राणी असल्याने स्थानिक नागरिकांनी आनंद व्यक्त केला. वन खात्याने ताब्यात घेऊन त्याच्यावर वैद्यकीय उपचार करण्यासाठी अवसरी घाटात आणण्यात आले आहे. उदमांजराला निसर्गाच्या सानिध्यात रविवारी सोडले जाणार असल्याचे सांगण्यात आले.छायाचित्र मजकूर चांडोली येथील शेतकऱ्यांच्या शेतात उदमांजर सापडले.

### शिवशक्ती रिक्षा युनियन कडून रिक्षा चालकांना जीवनांवश्यक वस्तूचे वाटप

ठाणे, दिवा (स. गांवकरी) : दिव्यात शिवशक्ती रिक्षा युनियनच्या वतीने यंदा रिक्षा चालक मालक यांना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले व दीपावलीच्या शुभेच्छा देऊन अध्यक्ष विनोद भगत व श्रीराम भगत यांच्या हस्ते वाटप करण्यात आले. शिवशक्ती रिक्षा युनियनच्या वतीने दरवर्षी रिक्षा चालक व मालक यांच्यासाठी अनेक उपक्रम राबविले जातात तसेच रिक्षा चालकांच्या आरोग्याची देखील काळजी घेत युनियनच्या माध्यमातून आरोग्य शिबीरे व इतर तपासण्याचे आयोजन करण्यात येते. दिवा शहरातील रिक्षा चालक हा कधीही एकाकी पडणार नाही व युनियन नेहमी त्यांच्या पाठीशी उभी राहिली असून युनियनच्या माध्यमातून त्यांना अनेक संधी भविष्यात उपलब्ध करून देण्याचा आमचा मानस आहे असे अध्यक्ष विनोद भगत यांनी बोलताना स्पष्ट केले. प्रसंगी शिवशक्ती रिक्षा युनियनचे खजिनदार प्रवीण बार्शीकर, श्रीराम भगत तसेच शेकडो रिक्षा चालक व मालक उपस्थित होते.

### एस्कॉर्ट्स कुबोटाकडून नवीन कुबोटा एमयू 4201 ट्रॅक्टर लॉंच

पुणे (स. गांवकरी) : एस्कॉर्ट्स कुबोटाने कुबोटा ब्रँडअंतर्गत नवीन ट्रॅक्टर कुबोटा एमयू 4201च्या लॉंचची घोषणा केली आहे. या लॉंचसह ब्रँडने भारतातील 41-44 एचपी श्रेणी बाजारपेठेत प्रवेश केला आहे. कंपनीचे ट्रॅक्टर्सचे तीन ब्रँड आहेत, ते म्हणजे फार्मट्रॅक, पॉवर ट्रॅक आणि कुबोटा. नवीन कुबोटा ट्रॅक्टर विविधशेतीसंबंधितवापरांसाठीडिझाइनकरण्यात आलाआहे, ज्यामध्येमालवाहतूक देखील करता येते. हा ट्रॅक्टररोटाव्हेटर, डिस्कहॅरोइत्यादीअनेकअवजारांशीअत्यंतसुसंगतआहे. जॅपनीज अभियंत्यांनी डिझाइन केलेल्या या नवीन ट्रॅक्टरमध्ये प्रीमियम वैशिष्ट्ये आहेत, जी 45-55 एचपी श्रेणीमधील विद्यमान कुबोटा ट्रॅक्टर्समध्ये उपलब्ध आहेत. यामध्ये फ्लॅट डेक, सस्पेंडेड पेडल्स, बॅलन्सर शाफ्ट, सिन्क्रोमेश ट्रान्समिशन आणि ड्युअल क्लचचा समावेश आहे. कंपनीने आपल्या कुबोटा एमयू 4501 आणि कुबोटा एमयू 5502 ट्रॅक्टर्सचे अपग्रेडेड व्हर्जन देखील लॉंच केले आहे. या ट्रॅक्टर्समध्ये उच्च दर्जाचे जॅपनीज लिफ्ट तंत्रज्ञान नवीन पोम्पा लिफ्टची भर करण्यात आली आहे.

## छोट्या मोठ्या उद्योगांना आधार देत साई आदर्श मल्टीस्टेटची २०० कोटींकडे वाटचाल समाधानकारक

### अरुण साहेब तनपुरे!

**राहुरी : (समर्थ गांवकरी)**



ग्रामीण भागातील छोट-मोठ्या उद्योगांना आधार देत सहकार चळवळीत आदर्शदायी काम करून ठेवीदारांचा विश्वास संपादन करत दोनशे कोटींकडे वाटचाल करण्याचे काम साई आदर्श मल्टिस्टेटच्या माध्यमातून सुरू असल्याचे प्रतिपादन डॉ. बा.बा.तनपुरे साखर कारखान्याचे चेअरमन अरुण तनपुरे यांनी केले आहे.

साई आदर्श मल्टीस्टेटच्या वतीने मुख्य सभागृहात दीपावली निमित्ताने आज शनिवारी सभासदांना लाभांश व कर्मचाऱ्यांना बोनस वाटप कार्यक्रम संपन्न झाला प्रसंगी ते बोलत होते.

प्रारंभी साई आदर्श पतसंस्थेच्या चेअरमन संगीता कपाळेयांनी सर्वांचे स्वागत केले.

यावेळी व्यासपीठावर प्रेरणा उद्योग समूहाचे अध्यक्ष सुरेश वाबळे,माध्यमिक शिक्षक सोसायटीचे चेअरमन आप्पासाहेब शिंदे,माध्यमिक शिक्षक सोसायटीचे संचालक संभाजी गाडे आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना श्री तनपुरे म्हणाले, कुठलीही संस्था चालवण्यासाठी संचालक मंडळ व कर्मचारी यांचे योग्य पाठबळ हवे असते ते साई आदर्शच्या संचालक व कर्मचाऱ्यांतून दिसून येते. साई आदर्श मल्टीस्टेट योग्य पद्धतीने कारभार करत असल्याने सर्वत्र नावलौकिक मिळविला असल्याचे ते म्हणाले.

आप्पासाहेब शिंदे म्हणाले की, साई आदर्श मल्टिस्टेटने संस्थेच्या हिताबरोबर सामाजिक बांधिलकी जोपासली आहे. शैक्षणिक क्षेत्रात विद्यार्थी व खेळाडूंना मदत देण्याचे काम संस्थेने केले आहे.

यावेळी प्रशांत वाबळे, शांती चौक मित्र मंडळाचे अध्यक्ष दिपक त्रिभुवन, वैभव गिरमे, माजी नगरसेवक प्रदीप गरड,येस बँकेचे व्यवस्थापक स्वानंद ब्राह्मणे, बाळासाहेब तांबे, धीरज कपाळे, अक्षय कपाळे, प्रकाश सोनी, पारस नहार, बाळासाहेब भालेराव, चांगदेव पवळे, रंगनाथ घाडगे, पुंजाभाऊ गांडूळे ,भास्कर कोळसे ,दत्तात्रय साळुंके,हर्षद ताथेड,नितीन डमाळे,अतुल त्रिभुवन,डॉ. बोरुडे,रामेश्वर तोडमल,सुनील संचेती, पोपट भंडारी, राजू शेख,राजू साळुंके, सर्जेराव शेटे, साई त्रिभुवन, सोनू आहेर, ऋषभ संचेती आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन पत्रकार गणेश विघे यांनी केले तर आभार अविनाश साबरे यांनी मानले.

## अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना ८४६ कोटी ९६ लाख रुपयांची मदत

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

दि. १८ :- सप्टेंबर २०२५ मध्ये झालेल्या अतिवृष्टी आणि पुरामुळे जिल्ह्यातील शेतीपिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते. या पार्श्वभूमीवर शासनाने ८ लाख २७ हजार ११८ शेतकऱ्यांना एकूण ८४६ कोटी ९६ लाख रुपयांच्या आर्थिक मदतीचा निर्णय घेतला आहे. दिवाळीपूर्वी ही मदत थेट शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्याच्या सूचना प्रशासनाला देण्यात आल्याची माहिती जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली. सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे राज्यातील विविध भागांतील शेतीपिकांचे नुकसान झाले असून, जिल्ह्यात सुमारे ६ लाख हेक्टर क्षेत्रावर या नैसर्गिक आपत्तीचा परिणाम झाला होता. या अनुषंगाने महसूल आणि कृषी विभागांना तातडीने पंचनामे करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. त्यानुसार जिल्ह्यातील बाधित शेतकऱ्यांच्या नुकसानीची आकडेवारी व मदतीचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला होता. राज्यातील सर्व बाधित जिल्ह्यांतील परिस्थितीचा आढावा घेऊन मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रीमंडळ बैठकीत एकूण ३ हजार २५८ कोटी ५६ लाख रुपयांच्या मदतीचा निर्णय घेण्यात आला.

## पाण्यासाठी आंदोलनकर्त्यांवर खटला; १३ वर्षानंतर लागला निकाल

### निर्दोष मध्ये राजकीय नेते, सामाजिक कार्यकर्ते

**राहुरी : (समर्थ गांवकरी)**



2012 मध्ये जायकवाडीला पाणी सोडावे लागले होते . यावेळी नगर जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी आंदोलन केले होते . यावेळी जायकवाडी धरणाचे पाणी बंद करून राहुरी तालुक्यातील डावा कालवा तसेच उजवा कालवा पाणी सोडण्याचे काम राहुरीच्या हितासाठी तत्कालीन व विद्यमान राहुरीचे आमदार शिवाजीराव कर्डिले , माजी खासदार बापूसाहेब तनपुरे , कै. शिवाजीराव गाडे पाटील यांच्या नेतृत्वात आंदोलन करण्यात आले होते त्यावेळी पाण्याचा विषय हा महत्त्वाचा होता यावेळी आंदोलकांना अटक झाली होती . गेल्या गेली तेरा वर्ष हा खटला अहिल्यानगर येथील जिल्हा सत्र न्यायालयात चालला आणि अहिल्यानगर जिल्हा सत्र न्यायाधीश शेख साहेब यांनी निर्दोष मुक्ताता केली . याप्रसंगी अ‍ॅड महेश तवले वकील , अ‍ॅड जालिंदर टाकते , यांनी कामकाज पाहिले . यातून तत्कालीन व विद्यमान आमदार शिवाजी कर्डिले , माजी खासदार बापूसाहेब तनपुरे, माजी आमदार चंद्रशेखर कदम, रविंद्र मोरे , रावसाहेब यादवराव तनपुरे , सिताराम भाऊ ढुस , आसाराम भाऊ ढुस , प्रा चांगदेव भोंगळ , सोन्याबापू जगधने , डॉ जयंत कुलकर्णी, डॉक्टर धनंजय मेहेत्रे, अण्णासाहेब बाचकर , तानाजी ढसाळ, माजी आमदार भाऊसाहेब कांबळे, नितीन तनपुरे, सर्जेराव घाडगे , सूर्यभान गाडे, प्रवीण लोखंडे, दत्ता जोगदंड, विजय डौले , शहाजी कदम, तसेच इतर आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात आली . त्यामुळे सर्वत्र आनंद व्यक्त करण्यात येत आहे.

## श्री शिवछत्रपती महाविद्यालय जुन्नर येथील ४४ विद्यार्थ्यांना नोकरीची संधी

**खोडद : (समर्थ गांवकरी)**



रिलायन्स फाउंडेशन पुणे आणि श्री शिवछत्रपती महाविद्यालय जुन्नर यांच्या संयुक्त विद्यमाने श्री शिवछत्रपती महाविद्यालयात प्रशिक्षण आणि नोकरी भरती कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती .या कार्यशाळेत ५९ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती .त्यापैकी ४४ विद्यार्थ्यांची प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण केल्याबद्दल बँक ,आयटी ऑफिस ,फायनान्स आणि प्रोडक्शन अशा विविध क्षेत्रामध्ये नोकरीची संधी प्राप्त झाली .अशी माहिती प्राचार्य डॉ .एम .बी .वाघमारे यांनी दिली .

कार्यशाळेत रिलायन्स फाउंडेशन पुणेच्या तर्फे प्रशिक्षक कविता प्रसाद ,मनीष भोसले आणि प्लेसमेंट ऑफिसर संतोष तांबे यांनी विद्यार्थ्यांना सॉफ्ट स्किल्स ,बायोडाटा तयार करणे ,संभाषण कौशल्य आणि सायबर सुरक्षा यांसारख्या विविध कौशल्यांचे प्रशिक्षण दिले .यावेळी प्रा .व्ही .बी .कुलकर्णी ,प्राचार्य डॉ .एम .बी .वाघमारे ,निकिता भोगवडे ,प्रोजेक्ट मॅनेजर विशाल वाघमारे ,ह्युमन रिसोर्स मॅनेजर सुरज तायडे ,आयकयुएसी प्रमुख डॉ .व्ही .एच .लोखंडे ,अभिषेक सावेकर ,माधुरी वासनिक ,ओमकार नांदूर आणि परमेश्वर खेडकर उपस्थित होते . कार्यशाळेचे नियोजन प्लेसमेंट सेल विभाग प्रमुख डॉ .अशोक दुर्शिंग ,प्रा .राहुल ससाणे ,प्रा .मयुरी कुंभोजे ,प्रा .संदीप थोरवे ,सीताराम शेळकंदे ,प्रा .एस .ए .परदेशी ,मितेश गाडेकर ,योगेश मस्करे ,एकनाथ घुटे आणि कुमार सूर्यवंशी यांनी केले होते.

## दिवाळी फराळ खरेदीसाठी ग्राहकांची गर्दी

**मंचर : (समर्थ गांवकरी)**

मंचर ता. आंबेगाव येथील साई बचत गटातील महिलांनी तयार केलेला दिवाळी फराळ खरेदीसाठी दूरवरून ग्राहक येत असून ग्राहकांची गर्दी होत आहे. फराळ बनवण्यासाठी सुमारे स्थानिक 300 महिलांना रोजगार गेल्या पंधरा दिवसापासून मिळाला असून येथील दिवाळी फराळ सातासमुद्रापार पोहोचल्याची माहिती बचत गटातील महिलानी दिली. मंचर येथील शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या शिवगिरी मंगल कार्यालयात सुरु असलेल्या साई दिवाळी फराळ विक्री केंद्रात दिवाळी फराळ खरेदीसाठी ग्राहकांची गर्दी वाढली आहे.साई बचत गट समूहाने गेल्या आठ वर्षापासून दिवाळी निमित्त फराळ विक्री केंद्र सुरु केले आहे.दररोज पाच टन फराळ करण्यासाठी ३०० महिलांना रोजगार मिळाला आहे. ना नफा ना तोटा या तत्वावर हे केंद्र चालविले जाते.

## अक्युपंक्चर पदविका अभ्यासक्रम ‘लाईफ सेट’करणारा पर्याय : डॉ. रुमी बेरामजी

### अक्युपंक्चर जनजागृती अभियान सुरू

**अकोले : (समर्थ गांवकरी)**




जगातील प्रमुख उपचारपद्धती म्हणून ओळखल्या जाणाऱ्या व अतिशय कमी खर्चात रामबाण उपाय देणाऱ्या अक्युपंक्चर उपचारपद्धती चा प्रचार व प्रसार होणे आवश्यक आहे. अतिशय कमी खर्चात पदविका मिळवून स्वतःचे क्लिनिक किवा देश परदेशात नोकरी द्वारे लाईफ सेट ‘ करणारा अभ्यासक्रम म्हणजे अक्युपंक्चर होय असे प्रतिपादन अक्युपंक्चर कौन्सिल चे प्रशासक डॉ. रुमी बेरामजी यांनी केले.

अक्युपंक्चर अभ्यासक्रम प्रवेश विद्यार्थी व पालक जनजागृती अंतर्गत आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी परिषदेचे प्रबंधक नारायण नवले,मातोश्री गंगूबाई शिंदे अक्युपंक्चर कॉलेज चे सचिव डॉ अनिल रहाणे,साई कॉलेज चे अध्यक्ष डॉ.दिपक शेवाळे आदि उपस्थित होते.

यावेळी बोलताना डॉ बेरामजी म्हणाले की १२० देशांनी अक्युपंक्चर थेरपी ला मान्यता दिली असून १००पेक्षा जास्त आजारांवर उपचार केले जातात. चीन मधे पंचतारांकित अक्युपंक्चर हॉस्पिटल आहेत. मुंबई व देशात देखील ही उपचार पद्धती झपाट्याने विकसित होत आहे. रिलायंस हॉस्पिटल मध्ये याचा स्वतंत्र विभाग असून आता सर्वच हॉस्पिटल याकडे वळत आहेत. त्यामुळे या अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना चांगली मागणी आहे. या अभ्यासक्रमानंतर विद्यार्थी अतिशय कमी खर्चात आपला व्यवसाय सुरू करू शकतात किवा नोकरी करू शकतात, अगदी २०/२५ हजार गुंतवणुकीत २/३ हजार रुपये रोज कमावू शकतो. ग्रामीण भागातील गरीब होतकरू विद्यार्थ्यांना जे मेडिकल चे महागडे शिक्षण घेवू शकत नाहीत त्यांचे डॉक्टर होण्याचे स्वप्न फक्त दीड लाखात पूर्ण होऊ शकते. महाराष्ट्र हे देशाला दिशादर्शक राज्य असून हे विद्यार्थी संपूर्ण देशात अक्युपंक्चर उपचारपद्धती घेऊन जातील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

प्रबंधक नारायण नवले यांनी सांगितले की १२ वी कोणतीही शाखा पास विद्यार्थी या अभ्यासक्रमास प्रवेश घेऊ शकतात. महाराष्ट्र शासन वैद्यकीय शिक्षण विभाग,आरोग्य विज्ञान विद्यापीठ व महाराष्ट्र अक्युपंक्चर कौन्सिल मार्फत मान्यता दिलेले १७ कॉलेज महाराष्ट्र भर सुरू आहेत. यात ४२४ विद्यार्थी प्रवेशित असून शै. वर्ष २०२५-२६ साठी चे प्रवेश ३१ ऑक्टोबर पर्यंत सुरू आहेत. अक्युपंक्चर कौन्सिल मार्फत सध्या २ वर्षाचा पदविका अभ्यासक्रम सुरु असून आरोग्य विज्ञान विद्यापीठाने पदवी अभ्यासक्रम व रिसर्च सेंटर साठी देखील परवानगी दिलेली आहे. टप्प्याटप्प्याने हे अभ्यासक्रम सुरु होतील. ही उपचार पद्धती नवीन असल्याने हवी तेवढी जनजागृती नसल्याने विद्यार्थ्यांचा ओढा कमी असला तरी सुंदर असे भविष्य असल्याने विद्यार्थ्यांनी झटपट स्वतःचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी या अभ्यासक्रमास प्रवेश घेण्याचे आवाहन त्यांनी केले. यावेळी परिषदेचा सर्व स्टाफ, संस्थाचालक व सर्व माध्यमांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# Vivo ने आंतरराष्ट्रीय स्तरावर Origin OS लाँच केले

------ : (समर्थ गांवकरी)

Vivo ने आज OriginOS च्या जागतिक लाँचची घोषणा केली, ही त्यांची आतापर्यंतची सर्वात प्रगत ऑपरेटिंग सिस्टम आहे, जी AI युगात मानव-मशीन संप्रेषणाची पुनर्परिभाषा करेल.

Vivo चे वरिष्ठ उपाध्यक्ष आणि मुख्य तंत्रज्ञान अधिकारी शी युजियान म्हणाले, "गेल्या अनेक वर्षांपासून, Vivo ने 'अधिक स्थानिक, अधिक जागतिक' या तत्त्वाचे पालन करून आणि वापरकर्त्यांच्या गरजांनुसार अनुभव देऊन जगभरात आपली उपस्थिती मजबूत केली आहे. Vivo चा 30 वा वर्धापन दिन साजरा करत असताना, आम्ही 'Origin Design' तत्वज्ञानाअंतर्गत, Smoothness, Design आणि AI या तीन स्तंभांवर आधारित, OriginOS 6 च्या जागतिक लाँचसह पुढील पाऊल उचलत आहोत, जे डिजिटल जगाशी कनेक्ट होण्याचा अनुभव पुन्हा परिभाषित करेल." Smoothness Mastery: Smooth दिसते, Smooth वाटते, नेहमी Smooth Origin OS 6 चे मूळ सार म्हणजे Smoothness—केवळ एक वैशिष्ट्य नाही, तर उत्कृष्टतेचा एक नवीन मानक आहे. ओरिजिन स्मूथ इंजिन सिस्टमच्या मुख्य मॉड्यल्समध्ये अखंडपणे समन्वय साधते: संगणकीकरण, स्टोरेज आणि डिस्प्ले, प्रत्येक स्तरावर एक गुळगुळीत वापरकर्ता अनुभव प्रदान करते. ८+१ अल्ट्रा-कोर संगणकीकरण ॲप कोल्ड-स्टार्ट गती १८.५% ने वाढवते आणि फ्रेम-रेट स्थिरता १०.५% ने सुधारते. मेमरी फ्यूजन डेटा लोडिंगला १०६% ने गती देते, तर ड्युअल रेंडरिंग ॲनिमेशन कामगिरीमध्ये ३५% वाढ आणि फ्रेम-रेट स्थिरतेमध्ये ११% सुधारणा देते. ओरिजिन ॲनिमेशन सिस्टमच्या गतिमान हालचाली, जसे की स्प्रिंग ॲनिमेशन, ब्लर ट्रान्झिशन्स, मॉर्फिंग ॲनिमेशन आणि वन-शॉट ॲनिमेशन, दृश्य अनुभव अधिक नैसर्गिक बनवतात. विवोचे स्नॅप-अप इंजिन तिकीट बुकिंगसारख्या उच्च-मागणी कार्यांसाठी संगणकीय शक्तीला प्राधान्य देते, वापरकर्त्यांना नेहमीच एक पाऊल पुढे ठेवते. ५० ॲप्स सतत उघडतानाही, लाँच गती १६% पर्यंत वेगवान असते आणि स्पर्श प्रतिसाद ४१% ने सुधारतो. Vivo X300 Pro (OriginOS 6 सह) ला SGS प्रमाणपत्र मिळाले आहे, जे 5 वर्षांच्या जास्त वापरानंतरही सुरळीत कामगिरीची हमी देते.

निसर्गाने आणि मानवी अनुभवांनी प्रेरित होऊन, OriginOS 6 हे डिजिटल जीवन सहज, साधे आणि सुंदर बनवण्यासाठी डिझाइन केले आहे. रंग, आकार, आयकॉन, फॉन्ट, लेआउट, सामग्री आणि खोली यासारखे सर्व दृश्य घटक संतुलित आणि अचूकपणे ओरिजिन डिझाइन सिस्टममध्ये एकत्रित केले आहेत. नवीन ब्रँड फॉन्ट, Vivo Sans2, आता 40 हून अधिक भाषांना समर्थन देते. डायनॅमिक ग्लो आणि ट्रान्सलुसेंट कलर तंत्रज्ञान प्रत्येक परस्परसंवाद अधिक जीवंत आणि आकर्षक बनवते.




पुणे : मराठी संस्कृती आणि मराठी भाषेच्या संवर्धनासाठी कार्यरत मराठी माझा अभिमान असोसिएशनतर्फे सुरमयी दिवाळी पहाट कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. रविवार, दि. १९ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी ६ वाजता सिम्बायोसिस ऑडिटोरियम, विमाननगर पुणे येथे ही संगीत मैफल रसिकांना अनुभवता येणार आहे, अशी माहिती असोसिएशनच्या उपाध्यक्षा अनिता लोखंडे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

## थोडक्यात बातम्या...



### वडाळा महादेव येथील भाविकांची शिवपुराण कथा प्रसंगी स्वप्नपूर्ती

वडाळा महादेव (स. गांवकरी) : जनसेवा फाउंडेशन आयोजित देशातील सर्वात मोठी शिवमहापुराण कथा अस्तगाव माथा (शिर्डी ) येथे संपन्न होत असताना वडाळा महादेव येथील भाविक शिवभक्त परिवार कथा ऐकण्यासाठी गेले असता या ठिकाणी राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील तसेच युवा नेते डॉ सुजय दादा विखे पाटील यांच्या निदर्शनास आले यावेळी पंडित प्रदीप मिश्रा यांनी वाहना मधून खाली उतरताच सदर परिवारातील सदस्य यांना आवाज देऊन बोलवुन घेतले प्रसंगी अंगावर शहारे आणणारा दृश्य अनेकांनी डोळ्यांनी अनुभवले कथावाचक पंडित प्रदीप मिश्रा यांची आतुरतेने डोळ्यात तेल घालून महाराज यांची येण्याची वाट पाहत उभे होते आणि त्यांच्या हातात भली मोठी हाताने बनवलेली पंडित प्रदीप मिश्रा यांची पेंटिंग केलेली प्रतिमा होती वाहनांच्या ताफ्यात पंडित प्रदीप मिश्रा यांचे आगमन होताच कदाचित त्यांनी काचेतून मंडपाजवळ उभ्या त्या कुटुंबाला उभं पाहिलं अन वाहनातून उतरतास त्यांना जवळ बोलावले त्यांच्या पेंटिंगचे कौतुक करत आभार मानले मात्र त्यानंतर अनेक वर्षांपासून महाराजांच्या जवळून दर्शन घेण्याची इच्छा असलेले कुटुंब या स्वप्नावत घडलेल्या प्रसंगानंतर अक्षरशः डसा डसा रडू लागले कथेचे आयोजक नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांच्या पाया पडत त्यांचे कथा आयोजित केल्याबद्दल परिवाराने कृतज्ञता व्यक्त करत अनेक वर्षांची महाराज यांची दर्शनाची इच्छा पूर्ण झाली आमचे जीवन सार्थक झाल्याची भावना व्यक्त करत कथा आयोजन केल्याबद्दल नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांचे आभार मानले यावेळी सुनील खैरनार विकास खैरनार सुरेश खैरनार आशा खैरनार व परिवाराने सर्वांचे आभार व्यक्त केले.

### विवो इंडियाने ओरिजिनओएस ६ इंडिया रोल-आउट टाइमलाइनची घोषणा केली




मुंबई (स. गांवकरी) : विवो इंडियाने आज देशातील त्यांच्या उत्पादन पोर्टफोलिओसाठी ओरिजिनओएस ६ (अँड्रॉइड १६ वर आधारित) साठी रोल-आउट टाइमलाइनची घोषणा केली. कंपनीची आतापर्यंतची सर्वात प्रगत ऑपरेटिंग सिस्टम असलेली OriginOS 6, नोव्हेंबरच्या सुरुवातीला X Series (X200 Pro, X200, X200 FE, आणि XFold 5) आणि V60 वर बॅचमध्ये अपग्रेडसाठी उपलब्ध असेल, त्यानंतर X100 Pro, X100 आणि XFold 3 Pro वर नोव्हेंबर 2025 च्या मध्यापर्यंत अपडेट उपलब्ध असेल. V Series (V60e, V50, आणि V50e) आणि T Series (T4 Ultra, T4 Pro, आणि T4R 5G) मधील डिव्हाइसेसना डिसेंबर 2025 च्या मध्यापर्यंत अपडेट मिळेल. याव्यतिरिक्त, X90, X90 Pro, V40, T4 5G, T3 Ultra, Y400 5G यासारख्या इतर सिरीज डिव्हाइसेसना इतर Vivo स्मार्टफोन्ससह 2026 च्या पहिल्या सहामाहीपासून अपडेट मिळण्यास सुरुवात होईल.

### पहिला 'खासदार क्रीडा महोत्सव' रंगणार २ ते १६ नोव्हेंबरदरम्यान




पुणे (स. गांवकरी) : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'फिट युवा फॉर विकसित भारत' या आवाहनाला प्रतिसाद देत, केंद्रीय सहकार व नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री आणि पुण्याचे खासदार मुरलीधर मोहोळ यांच्या पुढाकारातून पहिला 'खासदार क्रीडा महोत्सव' येत्या २ नोव्हेंबर ते १६ नोव्हेंबर २०२५ दरम्यान पार पडणार आहे. या १५ दिवसीय महोत्सवात शहरभरातील विविध मैदानांवर एकूण ३५ प्रकारच्या क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धा विविध खेळांच्या असोसिएशनच्या मदतीने आयोजित करण्यात येणार आहेत. महोत्सवाचे प्रमुख समन्वयक आणि छत्रपती पुरस्कार विजेते मनोज एरंडे यांनी सांगितले की, "या क्रीडा महोत्सवात खेळाडूंसोबतच ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग आणि सर्वसामान्य नागरिकांनाही आपले कौशल्य सादर करण्याची संधी मिळणार आहे. भारतीय पारंपरिक आणि ऑलिम्पिक स्पर्धांचा यात समावेश असून, सांघिक व एकेरी प्रकारात या स्पर्धा होणार आहेत." आर्चरी, ॲथलेटिक्स, बॅडमिंटन, स्विमिंग, बास्केटबॉल, बॉडी बिल्डिंग, बॉक्सिंग, कॅरम, बुद्धिबळ, सायकलिंग, क्रिकेट, फुटबॉल, जिम्नॅस्टिक्स, हॉकी, ज्युदो, कबड्डी, खो-खो, मल्लखांब, पिकलबॉल, रोलबॉल, शूटिंग, स्केटिंग, सॉफ्टबॉल, टेबल टेनिस, तायक्वांदो, टेनिस, व्हॉलीबॉल, वॉल क्लायम्बिंग, वॉटर पोलो, वेट लिफ्टिंग, कुस्ती, वुशू, योग, स्क्वॅश यांसारख्या विविध स्पर्धांचा समावेश आहे. दिव्यांगांसाठी विशेष ॲथलेटिक्स व ज्येष्ठांसाठी कॅरम स्पर्धा आयोजित करण्यात आल्या आहेत. स्पर्धा सणस मैदान, टिळक तलाव मैदान, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, बालेवाडी क्रीडा संकुल, स. प. महाविद्यालय, महाराष्ट्र मंडळ, डेक्कन जिमखाना, खराडी आदी ठिकाणी होणार आहेत. या सर्व स्पर्धांमध्ये २० ते २५ हजार खेळाडूंचा सहभाग अपेक्षित आहे.

## सर्वांवर भारी ठरत अर्जुन बिजलानीने ॲमेझॉन एमएक्स प्लेयरचा गाजलेला रिॲलिटी शो राईज अँड फॉल जिंकला

### नेहा कक्कर आणि टोनी कक्करपासून ते किंग आणि आस्था गिल यांच्या विशेष उपस्थितीपर्यंत, द राईज अँड फॉल ग्रँड फिनाले हंगाम भव्य शैलीत पूर्ण

मुंबई : (समर्थ गांवकरी)

हसू ते आसूपर्यंत, मैत्रीपासून ते तीव्र शत्रुत्वापर्यंतच्या या प्रवासाने प्रत्येक भावना आणि प्रत्येक मर्यादेची परीक्षा घेतली. प्रत्येक स्पर्धकाने स्वतःच्या लढाया लढल्या, घसरणीला सामोरे गेले आणि उदय साजरे केले. राईज अँड फॉलच्या घसरण-उदयाच्या संघर्षात आता अर्जुन बिजलानीला अंतिम विजेता म्हणून घोषित करण्यात आले. या कलाकाराने प्रतिष्ठित चषकावर स्वतःचे नाव कोरले. अशनीर ग्रोवरद्वारे होस्ट केलेला हा रिॲलिटी शो पदार्पणापासूनच चर्चेत अग्रेसर राहिला आणि देशभरातील प्रेक्षकांकडून प्रचंड प्रेम आणि प्रशंसा मिळवतो आहे. खिळवून ठेवणाऱ्या



आव्हानांपासून ते अविस्मरणीय क्षणांपर्यंत, तो एक सांस्कृतिक चर्चेचा मुद्दा बनला. अर्जुनने अगदी पहिल्या दिवसापासून प्रेक्षकांना आकर्षित केले. लवचिकता, रणनीती आणि उत्कटतेने खेळ खेळणाऱ्या स्पर्धकाला सन्मानित करून रोमांचक शेवटासह मालिकेचा समारोप झाला.

या हंगामात वेगवेगळ्या क्षेत्रातील 15 सेलिब्रिटी स्पर्धकांनी टॉवरच्या कुठलाही थांग लागणार नाही अशा रस्सी-खेचीत स्वतःची जागा निर्माण करण्याचा प्रयत्न केला. जिथे शासक पाताळात पडू शकतो आणि प्रत्येक वळण, कार्य आणि मतांसह संघर्ष करणारा उठून अग्रेसर होऊ शकतो. भावनिक संघर्ष आणि अग्रिमय युक्तिवादांपासून ते आश्चर्यकारक युती आणि अस्सल असुरक्षिततेच्या क्षणांपर्यंत, या मालिकेने प्रेक्षकांना सुरुवातीपासून शेवटपर्यंत खिळवून ठेवले. प्रमुख ठळक वैशिष्ट्यांमध्ये धोरणात्मक शक्ती खेळ, तीव्र सामना आणि लवचिकतेच्या हृदयस्पर्शी कृतींचा समावेश होता. जे सर्व रणनीती आणि भावना या दोन्हींचा उत्सव साजरा करणाऱ्या अंतिम टप्प्यापर्यंत पोहोचले.

टॉप-6 स्पर्धक अर्जुन बिजलानी, अरबाज पटेल, आकृति नेगी, आरुष भोला, धनश्री वर्मा आणि नयनदीप रक्षित यांच्या चमकदार सादरीकरणाने ग्रँड फिनालेची सुरुवात झाली. जेव्हा पवन सिंगने धनश्रीला साडी भेट देऊन भव्य प्रवेश केला, तेव्हा धनश्री आणि आकृतीसह एक चैतन्यदायी नृत्य झाले, तेव्हा मंच आणखी चमकला. स्पर्धकांनी जनताचा निकाल जाहीर करणारी सुटकेस उघडल्यानंतर तणाव वाढला, परिणामी नयनदीप रक्षित आणि धनाश्री वर्मा यांना बाहेर काढण्यात आले. नेहा कक्कर आणि टोनी कक्कर यांच्या उत्साहवर्धक सादरीकरणाने पुन्हा जोश संचारला. त्यानंतर माजी स्पर्धकांनी अव्वल-3 अंतिम स्पर्धकांसाठी मतदान केले, ज्यात आकृति नेगीला सर्वाधिक मते मिळाली आणि ती शर्यतीतून बाहेर पडली. किंग आणि आस्था गिल यांनी त्यांच्या आगामी म्युझिक रिॲलिटी शो आय-पॉपस्टारचा प्रचार केला, प्रतिभावान स्पर्धकांना सोबत आणले आणि दमदार उर्जेने मंच उजळून लावला.

आपल्या विजयाबद्दल बोलताना अर्जुन बिजलानी म्हणाला, "राईज अँड फॉल'ने हे सिद्ध केले की प्रत्येक पतन हे अधिक बळकट होण्याच्या दिशेने टाकलेले एक पाऊल आहे. हा प्रवास अगदी सोपा होता. प्रत्येक दिवस एक नवीन आव्हान, एक नवीन धडा आणि पुढे जाण्यासाठी एक नवीन कारण घेऊन आला. या चढ-उतारांनी, तणाव, मैत्री आणि प्रतिस्पर्ध्यांनी माझी अशी परीक्षा घेतली; ज्याची मी कल्पनाही केली नव्हती. जिंकणे अवास्तव वाटते. मला राइज अँड फॉलचा भाग राहिलेल्या प्रत्येक खेळाडूचे आभार मानायचे आहेत.

## एक्स्ट्रा मार्क्स शाळांमध्ये एक्स्ट्रा इंटेलिजेंसचा वापर!

पुणे : (समर्थ गांवकरी)

भारतातील अग्रगण्य एज्युकेशन कंपन्यांपैकी एक असलेल्या एक्स्ट्रामार्क्स एज्युकेशनने आज पुण्यात एक्स्ट्रा इंटेलिजेंस सादर करण्याची घोषणा केली, शिक्षकांना सक्षम करण्यासाठी, विद्यार्थ्यांना गुंतवून ठेवण्यासाठी आणि वर्गखोल्यांचे बुद्धिमान, सहयोगी शिक्षण वातावरणात रूपांतर करण्यासाठी डिझाइन केलेले एक अभूतपूर्व नवोपक्रम आहे. एक्स्ट्रा इंटेलिजेंससह, एक्स्ट्रामार्क्स ही पहिली शिक्षण कंपनी आहे, जी संपूर्ण शालेय परिसंस्थेत एआयला




अर्थपूर्णपणे एकत्रित करते.

यात धडा नियोजन आणि वर्गातील अध्यापनापासून ते मूल्यांकन आणि शाळेनंतरच्या शिक्षणापर्यंतचा समावेश आहे. या प्रसंगी, एक्स्ट्रामार्क्स एज्युकेशनचे मुख्य शैक्षणिक अधिकारी श्री. वेंकट फणिकिरन यांनी मुख्य भाषण दिले.

## कराडी टेल्सकडून 'टेन डेज टू दिवाळी' पुस्तकाचे पुण्यात प्रकाशन

### लहानग्यांसाठी हास्य आणि सणाचा आनंद

पुणे : (समर्थ गांवकरी)

भारतातील अग्रगण्य बालसाहित्य प्रकाशक कराडी टेल्स यांनी आपल्या नव्या चित्रपुस्तकाच्या माध्यमातून पुण्यात सणासुदीचा आनंद पसरवला. "टेन डेज टू दिवाळी" या पुस्तकाचे प्रकाशन रीडअबू लायब्ररी आणि कहानी किड्स लायब्ररी येथे रंगतदार पद्धतीने पार पडले. या वेळी लहान वाचक, पालक आणि शिक्षकांनी उत्साहात सहभागी होत मजेदार वाचन आणि कृती सत्रांचा आनंद घेतला. भारती सिंग लिखित आणि अंबिका करंदीकर यांनी चित्रित केलेले "टेन डेज टू दिवाळी" हे पुस्तक दिवाळीपूर्वी घराघरात सुरू होणाऱ्या साफसफाई, तयारी आणि गडबडीतील आनंददायक आणि विनोदी प्रसंगांवर आधारित आहे. कराडी टेल्सच्या पब्लिशिंग डायरेक्टर शोभा विश्वनाथ म्हणाल्या, "ही कथा दिवाळीपूर्वी घरात होणाऱ्या तयारीचा सार्वत्रिक अनुभव सुंदररीत्या मांडते. या सगळ्या सणाच्या गडबडीतून मुलांना नियोजन आणि कामाचे व्यवस्थापन या गोष्टी हलक्या-फुलक्या पद्धतीने शिकवते — आणि हे प्रत्येक कुटुंबाला भावेल




असं आहे." या कार्यक्रमाला निधी ठप्पर (Edunation Services), काजल छतिजा (Edudrone We Connect), वृषाली बबेरे (Enlit Kids) आणि सोनल बेहर (ः right ः eginners) यांसारख्या नामांकित शिक्षिका उपस्थित होत्या. त्यांनी या पुस्तकाच्या कथनशैलीचे, सांस्कृतिक संदर्भांचे आणि विनोदात्मक मांडणीचे कौतुक करत हे पुस्तक मुलं आणि पालक दोघांनाही भावेल असे मत व्यक्त केले. "टेन डेज टू दिवाळी" हे पुस्तक सर्व प्रमुख पुस्तकविक्री केंद्रांमध्ये तसेच ऑनलाइन www. karaditales.com येथे उपलब्ध आहे. अधिक माहितीसाठी भेट द्या: www.karaditales.com

## 'राहुल देशपांडे कलेक्टिव्ह'ने कोथरुडकर मंत्रमुग्ध

- माजी नगरसेविका हर्षाली माथवड यांच्या पुढाकाराने 'कोथरुड सुरोत्सव २०२५'चे आयोजन

पुणे : (समर्थ गांवकरी)

विविध रागांतील खास बंदिशी, सुगम गीतांचे बहारदार सादरीकरण आणि नवीनतेची जोड देत सादर झालेली अजरामर गाणी कोथरुडकरांना मंत्रमुग्ध करणारी ठरली. 'राहुल देशपांडे कलेक्टिव्ह'मधून प्रख्यात गायक राहुल देशपांडे यांनी



आपल्या रागदारीने, गायकीने श्रोत्यांना आपलेसे केले.

कोथरूड प्रभाग क्रमांक ३१ च्या नगरसेविका हर्षाली दिनेष माथवड यांच्या पुढाकाराने आयोजित दोन दिवसीय 'कोथरूड सुरोत्सव २०२५'चे दुसरे पुष्प राहुल देशपांडे यांच्या गायनाने गुंफले गेले. आयडियल कॉलनी मैदानावर झालेल्या या सांगीतिक मैफलीवेळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पुणे महानगर संघचालक रवींद्र वंजारवाडकर, मोनिका मुरलीधर मोहोळ, हर्षाली माथवड, दिनेश माथवड, नीलेश कोंढाळकर आदी उपस्थित होते.

'दीप की ज्योत जले' बंदिशीने मैफलीची सुरुवात करत राहुल देशपांडे यांनी 'तुज मागतो मी आता' मधून गणेशाला वंदन केले. त्यानंतर हिंदी-मराठी गाण्यांची सुरेल मैफल उत्तरोत्तर रंगत गेली. गायिका संहिता चांदोरकर यांची देशपांडे यांना उत्तम साथ मिळाली. अभिनेत्री स्पृहा जोशी हिच्या ओघवत्या व काव्यमय निवेदनाने रसिकांना मोहिनी घातली.

प्रास्ताविकात हर्षाली दिनेश माथवड म्हणाल्या, सुरोत्सवाच्या माध्यमातून पुण्याच्या आणि कोथरूडकरांच्या सांस्कृतिक अपेक्षांची पूर्तता करण्याचा हा प्रयत्न आहे. दोन्ही दिवस मोठ्या संख्येने या उपक्रमाला प्रतिसाद देणाऱ्या रसिकांविषयी कृतज्ञता व्यक्त करते. हा महोत्सव यापुढेही फुलत राहावा आणि नागरिकांच्या सेवेची मला संधी मिळावी."

## फॉक्सवॅगन इंडियाने पश्चिम भारतात आपली उपस्थिती ठळक केली

पुणे : (समर्थ गांवकरी)

फॉक्सवॅगन इंडियाने आज पुण्यात कस्टमर टचपॉइंट सुरू केल्याची घोषणा केली आहे. अशाप्रकारे महाराष्ट्रात या ब्रँडच्या नेटवर्कचा आणखी विस्तार झाला आहे. हे फॉक्सवॅगन पिंपरी चिंचवड सिटी स्टोअर या प्रदेशातील ग्राहकांसाठी आपल्या ब्रँडच्या जर्मन इंजिनियरिंगच्या कार्स अधिक सहज-प्राप्य बनवेल. पुण्यातील पिंपरी-चिंचवड विभागात आलेले हे फॉक्सवॅगनचे शोरूम ग्राहकांना त्यांच्या जागतिक दर्जाच्या कार्सचा शोध घेण्यासाठी आमंत्रित करत आहे, ज्यामध्ये प्रीमियम SUVW टाईगुन R-लाइनसह 5-स्टार GNCAP रेटेड टाईगुन आणि व्हर्टस या सगळ्या गाड्या एकाच छताखाली बघायला मिळतील. या सुविधेत तीन कार्सचा डिस्प्ले आणि ब्रँडच्या समृद्ध अनुभवासाठी प्रीमियम जागा आहेत. निष्ठावान व्यावसायिकांच्या अत्यंत कुशल टीमद्वारा समर्थित फॉक्सवॅगन पिंपरी चिंचवड शोरूम खरेदी आणि मालकीच्या प्रवासातील प्रत्येक टप्पा सुलभ आणि त्रासमुक्त करण्यास सज्ज आहे.

## धन्वंतरी पूजनानिमित्त वैद्य पुष्कर नरहर प्रभू यांचा सत्कार

### "आयुर्वेद हे केवळ औषधशास्त्र नसून जीवनशैली आहे" – श्री. शशांक साण्डू

नवी दिल्ली : (समर्थ गांवकरी)

धन्वंतरी जयंती व पूजनाच्या शुभ प्रसंगी साण्डू फार्मास्युटिकल्स लिमिटेड तर्फे आयोजित विशेष कार्यक्रमात आयुर्वेद क्षेत्रातील नामवंत वैद्य पुष्कर नरहर प्रभू यांचा सत्कार करण्यात आला. या प्रसंगी साण्डू फार्मास्युटिकल्स लिमिटेडचे संचालक श्री. शशांक साण्डू यांनी कंपनीचा १२५ वर्षांचा समृद्ध आयुर्वेदीय वारसा, विश्वासार्हता आणि समाजासाठीचे योगदान यावर प्रकाश टाकला.

कार्यक्रमात वैद्य पुष्कर प्रभू यांच्या दीर्घकाळाचा आयुर्वेद सेवाकार्याचा वारसा जोपासल्याबद्दल सन्मान करण्यात आला. या प्रसंगी डॉ. नागेश सांडू (संचालक), श्री. घनश्याम सांडू (संचालक), सौ. विद्या पुष्कर नरहर प्रभू आणि श्री. शशांक सांडू (संचालक), सांडू फार्मास्युटिकल्स हे उपस्थित होते.

श्री. साण्डू म्हणाले, "वैद्य पुष्कर प्रभू यांनी आपले वडिल आदरणीय वैद्य नरहर प्रभू यांचे आयुर्वेद क्षेत्रातील कार्य समर्थपणे पुढे चालवले आहे. आज चौथी पिढी त्यांच्या रूपाने हा वारसा पुढे नेत आहे. दादर येथील 'प्रभुवेद चिकित्सालय' मार्फत ते अनेक रुग्णांना निसर्गाधारित उपचार देत असून, विशेषतः कर्करोग व्यवस्थापनातील त्यांच्या संशोधनात्मक कार्याचा आम्हाला अभिमान आहे."

आयुर्वेदाविषयी बोलताना श्री. साण्डू म्हणाले, "आयुर्वेद हे केवळ औषधशास्त्र नाही, तर जीवनशैली आहे. धन्वंतरी पूजनाच्या या मंगल क्षणी साण्डू परिवार आरोग्यवर्धन आणि आयुर्वेदीय वारशाच्या संवर्धनासाठी कटिबद्ध असल्याचे आम्ही पुन्हा अधोरेखित करतो."

श्री. साण्डू यांनी पुढे सांगितले, "साण्डू फार्मास्युटिकल्सचा प्रवास १२५ वर्षांहून अधिक काळाचा आहे. १८९९ साली




आमचे संस्थापक स्वर्गीय वैद्य दत्तात्रय कृष्ण साण्डू आणि त्यांच्या 4 भावंडांनी याची मुहूर्तमेढ रोवली आणि प्राचीन आयुर्वेदाचे ज्ञान विज्ञानाधिष्ठित पद्धतीने समाजापर्यंत पोहोचविण्याचे ध्येय ठेवले.

त्यानंतर साण्डू परिवाराने पारंपरिक ग्रंथांवर आधारित पण आधुनिक गुणवत्ता मानकांनुसार तयार केलेली सुरक्षित आणि परिणामकारक औषधे लोकांसाठी उपलब्ध करून दिली. आमचा हेतू नेहमीच 'विश्वासार्ह आयुर्वेद' हा विचार प्रत्यक्षात उतरविण्याचा राहिला आहे."

ते म्हणाले, "आजच्या काळात काही निकृष्ट औषधनिर्मितीमुळे लोकांमध्ये निर्माण झालेल्या असुरक्षिततेच्या पार्श्वभूमीवर आयुर्वेदिक औषधे ही एक विश्वासार्ह, नैसर्गिक आणि सुरक्षित पर्याय ठरत आहेत. साण्डू फार्मास्युटिकल्स लिमिटेडने नेहमीच शुद्ध घटक, शास्त्रोक्त प्रक्रिया आणि काटेकोर गुणवत्ता नियंत्रण यांचा अवलंब केला आहे हेच आमचे सर्वात मोठे बळ आहे."

यानंतर वैद्य पुष्कर प्रभू यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करून आयुर्वेद हे आपले शास्त्र जगाचे आरोग्य जपण्याचे कार्य करू शकते, यासाठी याचा प्रसार आणि प्रचार तसेच संतुलित जीवनशैलीचा दैनंदिन जीवनात कसा उपयोग करावा याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले.

# जीएसटी कपातीचा फायदा ग्राहकांना नाही



## उत्पादक कंपन्यांच्या दरवाढीने ग्राहक नाराज

मंचर : (समर्थ गांवकरी)

केंद्र सरकारने बिल्डिंग मटेरियलवरील जीएसटी कमी करून ग्राहकांना दिलासा देण्याचा प्रयत्न केला असला, तरी प्रत्यक्षात त्याचा फायदा ग्राहकांपर्यंत पोहोचलेला नाही. दुकानदार आणि ग्राहक यांच्यात बाजारभाव कमी न झाल्याबद्दल शाब्दिक चकमक उडत आहे. सिमेंटवरचा जीएसटी २८ टक्क्यांवरून १८ टक्क्यांवर आणि मार्बलवरचा १२ टक्क्यांवरून ५ टक्क्यांवर आणण्यात आला आहे.मात्र, उत्पादक कंपन्यांनी आपल्या मूळ किमतींमध्ये वाढ केल्याने बाजारात सिमेंट आणि इतर बांधकाम साहित्याचे दर पूर्वीप्रमाणेच आहेत.सध्या सिमेंटच्या एका बॅगेची किंमत ३०० ते ३३० रुपये दरम्यान असून, जीएसटी कमी झाल्यानंतरही कोणताही बाजारभावात फरक पडलेला नाही.दरवाढीमुळे ग्राहक नाराज झाले असून, अनेक ठिकाणी दुकानदारांशी हुज्जत घालत असल्याचे चित्र दिसत आहे. केंद्र सरकारने ग्राहकांना स्वस्त दरात वस्तू मिळाव्यात.यासाठी जीएसटी कपात केली होती, परंतु कंपन्यांनी उत्पादन खर्च वाढल्याचे कारण देत दर वाढवले आहेत. त्यामुळे सरकारच्या निर्णयाचा वास्तविक लाभ ग्राहकांपर्यंत पोहोचू शकलेला नाही.बांधकाम क्षेत्रात सध्या मंदीचे वातावरण असून, ग्राहक आणि विक्रेते दोघेही गोंधळात पडले आहेत.सरकारने जीएसटी कमी केल्याचं ऐकून आम्ही बांधकाम साहित्य स्वस्त होईल असं गृहित धरलं होतं, पण अजूनही सिमेंटचे दर तसेच आहेत.

कंपन्यांनी वाढवलेले रेट आमच्यासाठी परवडणारे नाहीत.""कंपन्यांनी मूळ दर वाढवले म्हणून आम्हीही जुन्याच दराने विक्री करावी लागते.



मंचर : दीपावलीचा आनंद साजरा करण्यासाठी मंचर बाजारपेठ रंग, प्रकाश आणि सजावटीच्या वस्तूंनी उजळून निघाली आहे. पणत्या, पणत्यांची ताटे, झुंबर माळा, लम्हणदिवे, तसेच लक्ष्मीपूजनासाठी लागणारे सर्व साहित्य मोठ्या प्रमाणात उपलब्ध झाले आहे.

## थोडक्यात बातम्या...

### सिंगापूर न्यायालयाकडून झेट्टाईच्या पुनर्रचना योजनेला मंजुरी

पुणे (स. गांवकरी) : झेट्टाई प्रा. लि. यांनी आज जाहीर केले की, वझीरएक्सच्या पुनर्प्राप्ती प्रवासातील एक महत्त्वपूर्ण टप्पा म्हणून सिंगापूर उच्च न्यायालयाने झेट्टाई प्रा. लि. द्वारे प्रस्तावित आणि कर्जदारांनी मान्य केलेल्या पुनर्रचना योजनेत सुधारणा करून अधिकृत मंजुरी दिली आहे. हा निर्णय ९५.७ टक्के मतदान करणाऱ्या कर्जदारांनी – जे मूल्याच्या दृष्टीने ९४.६ टक्के प्रतिनिधित्व करतात – ऑगस्ट २०२५ मध्ये या योजनेच्या बाजूने पुनःमतदान केल्यानंतर घेण्यात आला. या मंजुरीमुळे झेट्टाई आणि वझीरएक्स वापरकर्त्या समुदायांमधील काही महिन्यांच्या संयुक्त प्रयत्नांचा यशस्वी परिणाम साधला गेला असून, प्लॅटफॉर्मच्या पुन्हा सुरूवातीचा मार्ग मोकळा झाला आहे. वझीरएक्सचे संस्थापक निश्चल शेट्टी म्हणाले, “ही मंजुरी आमच्या प्रवासातील एक निर्णायक क्षण आहे. या क्षेत्रातील इतिहासातील सर्वात मोठ्या सायबर हल्ल्यानंतरदेखील, वझीरएक्सने जगातील सर्वाधिक जलद पुनर्रचना केलेल्या उद्योगांपैकी एक म्हणून आपली ओळख निर्माण केली आहे. आम्ही आमच्या कर्जदारांच्या सर्वोत्तम हितासाठी काम करण्यास कटिबद्ध आहोत. या योजनेला कायदेशीर मान्यता मिळताच, पुढील १० कामकाजाच्या दिवसांत प्लॅटफॉर्मवरील कार्यवाही पुन्हा सुरू केली जाईल. आमच्यावर विश्वास ठेवणाऱ्या आणि संयम दाखवणाऱ्या सर्वांचे आम्ही मनःपूर्वक आभार मानतो.”

### स्वराज गायकवाड विद्यार्थ्यांची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड

मंचर (स. गांवकरी) : मंचर ता.आंबेगाव येथील अण्णासाहेब आवटे महाविद्यालयातील स्वराज गायकवाड या विद्यार्थ्यांची राष्ट्रीय ज्युनिअर ॲथलेटिक्स चॅम्पियनशिप स्पर्धेसाठी निवड झाली.अशी माहिती प्राचार्य डॉ.नानासाहेब गायकवाड यांनी दिली. पुणे ॲथलेटिक्स असोसिएशन अंतर्गत बालेवाडी पुणे येथे झालेल्या राज्य स्तरीय थाळी फेक स्पर्धेत स्वराज अंकुश गायकवाड याने सुवर्ण पदक प्राप्त केले.त्याची कलिंगा स्टेडीयम ,भुवनेश्वर (ओडिसा) येथे होणाऱ्या 40 व्या राष्ट्रीय ज्युनिअर ॲथलेटिक्स चॅम्पियनशिप साठी निवड झाली.त्याबद्दल त्याचे महाविद्यालयीन विकास समिती, प्राचार्य डॉ.नानासाहेब गायकवाड, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.त्याला शारीरिक शिक्षण संचालक डॉ.सुनिल पानसरे व प्रा.डी.एस.टेकाळे याचे मार्गदर्शन केले.

### नारोडीमध्ये घुमू लागले आरतीचे स्वर

मंचर (स. गांवकरी) : आंबेगाव तालुक्यातील नारोडी परिसरात पहाटेचा काकड आरती सोहळा उत्साहात सुरू आहे.पहाटेच्या प्रसन्न वातावरणात काकड आरती सोहळा परिसरातील गावागावातील मंदिरामध्ये सुरू झाल्याने वातावरण चैतन्यमय झाले आहे. नारोडी येथील श्री मुक्तादेवी मंदिरामध्ये कोजागिरी पौर्णिमेपासून आश्विन महिन्यात काकड आरती उत्सव सुरू झाला.हा उत्सव त्रिपुरारी पौर्णिमेपर्यंत एक महिना कालावधीत काकड आरती सोहळा आयोजित केला जात आहे.अशी माहिती येथील श्री मुक्तादेवी भजनी मंडळ यांनी दिली.मंडळातील ज्ञानेश्वर महाराज हुले ,पांडू महाराज हुले, दत्ता नाईक ,चंद्रकांत कदम, एकनाथ हुले, किसन हुले, हरिभाऊ भागवत, हनुमंत हुले, खंडु हुले, निवृत्ती हुले, गोरक्षनाथ हुले ,तुकाराम हुले,अशोक पिंगळे, गोरक्षनाथ पिंगळे, प्रमोद पिंगळे, राजेंद्र हुले, दिपक हुले,दत्ता चव्हाण, राजश्री नाईक, रंजना हुले, कृष्णाबाई हुले,चंद्रभागा काळे, रंजना मोरे, सुलोचना हुले यांच्यासह जेष्ठ नागरिक व ग्रामस्थ एकत्र येऊन काकड आरतीच्या वेळी एकत्रित येऊन सहभागी होतात.आरतीचा मान तुषार हुले व ज्येष्ठ नागरिक संघाचे संचालक सुभाष हुले यांना मिळाला. त्यानंतर भाविकांना प्रसाद वाटप करण्यात आला.शेवटी पसायदानाने काकड आरती विधीचा समारोप करण्यात आला.

### जवळा येथे संविधान अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त राज्य घटनेचे क्रमशः वाचन

नांदेड (स. गांवकरी) : नांदेड दक्षिण तसेच लोहा तालुक्यातील विश्वशांती बुद्ध विहार जवळा (दे.) येथे संविधान अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त दररोज रात्री आठ वा. भारतीय राज्यघटनेचे क्रमशः वाचन करण्यात येत असुन, भारतीय बौद्ध महासभा जवळा (दे.) ग्राम शाखेच्या या अनोख्या उपक्रमामुळे गावातील तसेच परिसरातील सुजान नागरिकाकडुन सर्व युवा मित्रमंडळीचे आणि ज्येष्ठ नागरिक यांचे कौतुक होत आहे. नेहमी जवळा येथील विश्वशांती बुद्ध विहार समिती, सार्वजनिक भीम जयंती मंडळ, डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती आणि भारतीय बौद्ध महासभा ग्राम शाखेच्या माध्यमातून विविध उपकर्म विश्वशांती बुद्ध विहार जवळा या ठिकाणी राबविले जातात. त्यामध्येच भारतीय संविधानाचे अमृत महोत्सवी वर्ष अर्थात 26 नोव्हेंबर 1949 रोजी हे संविधान देशासाठी अर्पण करण्यात आले होते. तेव्हापासून सध्या 75 वे वर्ष चालू असून, हे अमृत महोत्सवी वर्ष म्हणून संपूर्ण भारतभर मोठ्या हर्षोउल्हासामध्ये साजरे करीत आहोत. त्याच अनुषंगाने विश्वशांती बुद्ध विहार जवळा या ठिकाणी आपण हे अमृत महोत्सवी वर्ष साजरा करत आहोत. याची सुरुवात जवळा येथे दि.14 ऑक्टोबर 2025 रोजी 'धम्मचक्र प्रवर्तन या दिनापासून, विश्वशांती बुद्ध विहार जवळा या ठिकाणी, भारतीय राज्यघटनेचे कर्मश: वाचन होत आहे. या मागचा प्रांजळ उद्देश असा आहे की, संविधानातील कलमा सर्व सुजान नागरिकांच्या कानावर पडाव्यात. तसेच स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांनाही संविधानाचे आकलन व्हावे. आणि याबद्दल आदर निर्माण व्हावा, असे आहे. भारतीय संविधानाचे कर्मश: वाचन भारतीय बौद्ध महासभेचे ग्राम शाखा अध्यक्ष बोधाचार्य सुरेश गौतम गोडबोले तथा सरचिटणीस भीमराव चांदू गोडबोले आणि जिल्हा संरक्षण सचिव तथा आकाशवाणी नांदेड केंद्राचे प्रासंगिक निवेदक आनंद पुरभाजी गोडबोले हे करत आहेत. तरी सुरज कैलास गोडबोले, बंटी सुरेश गोडबोले, पंकज पुरभाजी गोडबोले, धम्मदिप भिमराव गोडबोले, गोलु ढगे, सुलोचनाबाई राजेश्वर गच्चे, पुष्पाबाई पुरभाजी गोडबोले, प्रीती पुरभाजी गोडबोले यांच्या सह आदी सुजान नागरिकांची उपस्थिती होती.

# दिवाळी अंक हे मराठी साहित्य आणि संस्कृतीचा उत्सव

## निवासी आयुक्त तथा सचिव आर. विमला



नवी दिल्ली : (समर्थ गांवकरी)

महाराष्ट्रातील समृद्ध दिवाळी अंक परंपरेने मराठी साहित्य आणि संस्कृतीला बौद्धिक उंची प्रदान केली आहे. दिवाळी अंक हे केवळ साहित्य नाही, तर मराठी माणसाच्या सांस्कृतिक आणि बौद्धिक जाणिवांचा उत्सव असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र सदनाच्या निवासी आयुक्त तथा सचिव आर. विमला यांनी आज येथे व्यक्त केले. दिल्लीतील महाराष्ट्र परिचय केंद्रात आयोजित दिवाळी अंक प्रदर्शन २०२५चे उद्घाटन आयुक्त आर. विमला आणि सकाळ माध्यम समूह संपादक सम्राट फडणीस यांच्या हस्ते झाले. यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी मार्गदर्शन करतांना श्रीमती विमला यांनी सांगितले की दिवाळी अंक नवोदित लेखकांपासून ज्येष्ठ साहित्यिकांपर्यंत सर्वांना एक व्यासपीठ देणारे आहेत.

दिवाळी अंक हे अंक मराठी वाचकांसाठी 'वाचनाचा महोत्सव' ठरतात. कथा, कविता, निबंध, समीक्षा आणि सांस्कृतिक विषयांवरील लेखांनी समृद्ध असलेले हे अंक प्रत्येक वाचकाच्या अभिरुचीला साजेसे आहेत. दिल्लीतील मराठी वाचकांसाठी हे प्रदर्शन म्हणजे खऱ्या अर्थाने साहित्यिक पर्वणी आहे. या संधीचा सर्वांनी लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

सकाळ माध्यम समूहाचे संपादक सम्राट फडणवीस यांनी महाराष्ट्र परिचय केंद्राच्या या उपक्रमाचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या. परिचय केंद्राची माध्यमांसोबत राहण्याची आणि पाठिंबा देण्याची भूमिका अधोरेखित करून महाराष्ट्र परिचय केंद्राच्या माध्यमातून महाराष्ट्राची सर्वांगीण आणि सविस्तर माहिती उपलब्ध करून देण्यात यावी अशी अपेक्षा त्यांनी यावेळी व्यक्त केली.

महाराष्ट्र परिचय केंद्राचे हे प्रदर्शन दिल्लीतील मराठी भाषिकांसाठी सांस्कृतिक मेजवानी आहे.

वाचकांनी या प्रदर्शनास भेट मराठी साहित्याच्या समृद्ध परंपरेचा आनंद घ्यावा, असे आवाहन प्र. उपसंचालक मनीषा पिंगळे यांनी केले. या कार्यक्रमाला सहायक निवासी आयुक्त नितीन शेंडे, स्मिता शेलार, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे माजी संचालक गणेश रामदासी, सदनाचे व्यवस्थापक प्रमोद कोलपते, माध्यम प्रतिनिधी, कर्मचारी वर्ग आणि साहित्यप्रेमी उपस्थित होते.

प्रदर्शनात 'गृहलक्ष्मी', 'आवाज', 'मिळून साऱ्याजणी', 'चार चौघी', 'श्री व सौ', 'अंतर्नाद', 'जत्रा', 'किशोर', 'लोकसत्ता', 'महाराष्ट्र टाईम्स', 'लोकमत-दिपोत्सव', 'साप्ताहिक सकाळ', 'झी मराठी', 'धनंजय', 'साधना', 'सामना', 'अक्षरधारा', 'प्रपंच', 'छावा', 'मैत्र', 'निनाद', 'हंस', 'ऋतुरंग', 'स्वरप्रतिभा' यांसारखे १२० हून अधिक मान्यवर विशेषांक उपलब्ध आहेत.

याशिवाय हस्तलिखित अंकांचाही समावेश आहे. हे प्रदर्शन २४ ते ३१ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० या वेळेत विनामूल्य खुले राहणार आहे.

# स्मोकफ्री इंडियाचे सीओपी ११ कडे आवाहन

पुणे : (समर्थ गांवकरी)

स्मोकफ्री इंडियाने जागतिक आरोग्य संघटनेच्या तंबाखू नियंत्रण फ्रेमवर्क कन्व्हेन्शन च्या सीओपी ११ अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर एक चार-सूत्री आवाहन जारी केले आहे. या आवाहनाद्वारे भारतातील तरुणांमध्ये वाढत्या तंबाखूच्या संकटावर तातडीने आणि विज्ञानाधारित उपाययोजना राबवण्याची मागणी करण्यात आली आहे. दररोज सुमारे ५,५०० भारतीय मुले तंबाखूचे सेवन सुरू करतात. १३ ते १५ वयोगटातील प्रत्येक पाच शालेय विद्यार्थ्यांपैकी एकाने तंबाखूचा अनुभव घेतला असून त्यातील सुमारे ९ टक्के सध्या नियमित वापरकर्ते आहेत. प्रौढावस्थेपर्यंत २८ टक्के लोक धूम्रपान करतात, तर १५ टक्के स्मोकलेस तंबाखूचा वापर करतात. बीएलके-मॅक्स सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, नवी दिल्लीचे पल्मनरी मेडिसीन विभागाचे वरिष्ठ सल्लागार डॉ. पवन गुप्ता यांनी सांगितले की, “तंबाखूचे दुष्परिणाम आयुष्यभर टिकतात आणि किशोरवयात सेवन सुरू करणाऱ्या तरुणांवर याचे परिणाम अधिक गंभीर होतात. तोंडाचा कर्करोग, फुफ्फुसाचे आजार आणि हृदयविकार ही त्याची भीषण उदाहरणे आहेत.

# सरपंच चित्तरंजन गायकवाड व गौरी गायकवाड यांची घरवापसी

हवेली : (समर्थ गांवकरी)



हवेली तालुक्यातील राजकीय दृष्ट्या महत्त्वाची संबोधली जाणारी कदम वाकवास्ती ग्रामपंचायतीचे माजी सरपंच चित्तरंजन गायकवाड, माजी पंचायत समिती सदस्य गौरी गायकवाड, उपसरपंच नासिरखान पठाण, सदस्य स्वप्नेश कदम, आकाश काळभोर, कोमल काळभोर, स्मिता लोंढे, बिना काळभोर, राजश्री काळभोर, मंदाकिनी नामूगडे, अविनाश बडदे, रमेश कोतवाल,शब्बीर पठाण तंटामुक्ती अध्यक्ष अभिजीत बडदे माजी अध्यक्ष विकास कदम असे शेकडो कार्यकर्ते व आजी-माजी सदस्य भाजपचा झेंडा दौंडचे आमदार राहुल कुल, भाजपा पुणे जिल्हा अध्यक्ष प्रदीप कंद यांच्या नेतृत्वाखाली घेतला आहे. हा प्रवेश मुंबई येथे भाजपा कार्यालयात प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रमाचे आयोजन करून मंगळवार (दी.14) करण्यात आले होते. यावेळी हवेली तालुका भाजपा सरचिटणीस सोलापूर रोड कमलेश काळभोर, सोलापूर रोड मंडल अध्यक्ष गणेश चौधरी व भाजपचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी बोलताना प्रदीप कंद म्हणाले चित्तरंजन गायकवाड यांचा जनसंपर्क चांगला आहे. त्यांनी भाजपचे कामगार आघाडीचे जिल्हाध्यक्ष पद भूषविले आहे. तर त्यांच्या पत्नी कदम वाकवस्ती च्या पहिल्या लोकनियुक्त सरपंच होत्या व माजी पंचायत समिती सदस्य पण होत्या दरम्यानच्या काळात पक्षातील अंतर्गत गटबाजीमुळे मतभेद निर्माण झाले होते.

या मतभेदामुळे त्यांनी पक्षाला राम राम ढोकला होता. पण पक्षाच्या दृष्टिकोनातून त्यांचे मत परिवर्तन करणे अत्यंत महत्त्वाचे होते. यात सर्वात मोठा वाटा प्रदीप कंद व दौंडचे आमदार राहुल कुल यांचे महत्त्वाचे होते.

या प्रवेशामुळे आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत भाजपला मोठा फायदा होण्याची शक्यता आहे असे राजकीय जाणकार म्हणत आहेत.

# सानेगुरुजींच्या कथा सांगून संस्कार करणे गरजेचे

मंचर: (समर्थ गांवकरी)



विद्यार्थ्यांनी संस्कारक्षम कथा वाचनातून जीवनमूल्ये आत्मसात करावी.आजच्या डिजिटल युगात पालकांनी मुलांना सानेगुरुजींच्या संस्कारक्षम कथा सांगून संस्कार करणे गरजेचे आहे.असे आवाहन अखिल भारतीय सानेगुरुजी कथामालेचे राज्याध्यक्ष श्यामराव कराळे गुरुजी यांनी केले. निगडाळे (ता.आंबेगाव) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत अखिल भारतीय सानेगुरुजी कथामाला पुणे जिल्हा समिती ग्रामीणचे अध्यक्ष बाळासाहेब कानडे गुरुजी यांच्या वतीने आयोजित विद्यार्थ्यांसाठी कथाकथन कार्यक्रम आणि पालकांसाठी संस्कार मार्गदर्शन मेळाव्यात विद्यार्थी व पालकांशी संवाद साधताना कथामाला राज्याध्यक्ष कराळे बोलत होते. यावेळी शरद बँकेचे संचालक मारुती लोहकरे,उपसरपंच नितीन लोहकरे, वनसमितीच्या अध्यक्षा अनिता लोहकरे,सामाजिक कार्यकर्ते जितेंद्र गायकवाड,केंद्रप्रमुख निळकंठ कोरडे,मुख्याध्यापिका शोभा जाधव,शिक्षक संतोष थोरात, उद्धव डेरे,अंगणवाडी मदतनीस लीलाबाई लोहकरे,निलेश लोहकरे, विजया कराळे, ग्रामस्थ,पालक व विद्यार्थी उपस्थित होते.कार्यक्रमाचे संयोजन पालक राहुल गायकवाड,अनंता भोमाळे,चिंधाबाई लोहकरे,योगिता भोमाळे,कमल कुऱ्हाडे,वेणूबाई तिटकारे,हिराबाई केंगले, अंजना पवार,अंकुश लोहकरे यांनी केले.प्रास्ताविक व स्वागत शिक्षक संतोष थोरात आणि आभार मुख्याध्यापिका शोभा जाधव यांनी मानले.

# मुलींनी टाकाऊपासून बनवले आकाश कंदील

नांदेड : (समर्थ गांवकरी)

जिल्ह्यातील शाळांना दिपावली निमित्त दि. १७ पासून सुट्ट्या सुरू झाल्या आहेत. दिपावली सण हा साधारणपणे पाच दिवसांचा असतो. दिवाळी सण मोठा नाही आनंदाला तोटा असेही म्हटले जाते. या काळात सोने, कपडे, दिवे, मिठाई, फटाके, शोभेच्या वस्तू तसेच सजावटीचे साहित्य मोठ्या प्रमाणावर खरेदी केले जाते. बाजारपेठा विविध प्रकारच्या वस्तूंनी फुललेल्या असतात. रंगीबेरंगी आकाशकंदीलही मोठ्या प्रमाणावर विक्रीला उपलब्ध असतात. बाजारात महागडे आकाशकंदील विकत घेण्याइतकेही पैसे नसणाऱ्या शाळेतील मुलींनी टाकाऊ वस्तू पासून आकाशकंदील तयार केले आहेत. जवळा दे. येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेतील मुलींनी शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली वापरलेले पुठ्ठे, नक्षी, ठसे, जाड कागद, झालर, मणी आदी वस्तूंपासून आकर्षक आकाशकंदील तयार केले.

# या सणासुदीच्या काळात एकतेचा आणि आपुलकीचा उत्सव साजरा करा

पुणे : (समर्थ गांवकरी)




भारत सगळ्यात आनंददायी अशासणांच्या काळात प्रवेश करत असतानाझी टीव्ही वाहिनीकरवा चौथ, धनतेरस, दिवाळी आणि भाऊबीज या सणांना केवळ साजरे करण्यापुरते न ठेवतात्या सणांनाकथा, एकत्रयेणेआणि आपलेपणाचा उत्सवबनवण्यासाठीसज्ज आहे. आपली नवीन ओळख ‘आपका अपना झी टीव्ही’नुसार ही वाहिनी घेऊन येत आहे‘अपनोत्सव’ – एक महिनाभर चालणारा उत्सव, जोड्रामा, हास्य आणि सामूहिक परंपरांचा जादुई संगमसोशल मीडिया, ऑन-एअर आणि ऑन-ग्राऊंड या सर्व प्लॅटफॉर्म्सवर एकत्रित अनुभव म्हणूनसाजरा करेल. गेल्या तीन दशकांहून अधिक काळापासून झी टीव्हीने भारतीय दूरदर्शनवरील सणांच्या कार्यक्रमांची परंपरा पुढे नेली आहे. कुटुंबांना एकत्र आणणारे भव्य कार्यक्रम आणि विशेष प्रसंग साकारले आहेत. ‘अपनोत्सव’च्या माध्यमातून झी टीव्ही पुन्हा एकदा सणासुदीचा काळ घराच्या ऊबदारपणाचा, नात्यांचा आणि आपलेपणाचा उत्सव बनवत आहे. उत्साही कार्यक्रम, रोमांचक स्पर्धा आणि समुदायावर आधारित उपक्रमांद्वारे सामायिक परंपरांचा आनंद पुन्हा जागवत आहे. या महिनाभर चालणाऱ्या मोहिमेत प्रेक्षकांना विविधरंगी आणि आकर्षक कार्यक्रमांचा संगम पाहायला मिळणार आहे. झी टीव्हीवरील लोकप्रिय नवीन मालिका ‘जगधात्री’चा विशेष भाग, ज्यातएका तरुण मुलीची कथा जी स्वतःच्या घरात दुर्लक्षित असली तरी निडर गुप्तहेर म्हणून गुन्हेगारीविरुद्ध लढा देत स्वतःची ओळख पुन्हा मिळवते; ‘आयडियाबाज’ – नवकल्पना आणि उद्योजकतेचा उत्सव साजरा करणारा रिॲलिटी शो, जो नव्या भारताच्या स्वप्नांना आणि कल्पनांना मंच देतो; ‘झी रिश्तों का मेला’ दिवाळी विशेष भाग – आपुलकीच्या नात्यांचा उत्सव; तसेच ब्लॉकबस्टर चित्रपटांचे प्रीमियर आणि ‘महा एपिसोड्स’चा सतत प्रवाह. या सर्व कार्यक्रमांची रूपरेषा अशी तयार केली गेली आहे कीप्रेक्षक आपल्या आवडत्या पात्रांशी आणि एकमेकांशी वर्षातील सर्वात अर्थपूर्ण प्रसंगांदरम्यान जोडलेले राहतील. सणांचा उत्सव फक्त पडद्यापुरता मर्यादित न ठेवता, झी टीव्ही एक अनोखी आणि पहिल्यांदाच सादर होणारी इंटरॅक्टिव ऑन-एअर स्पर्धा घेऊन येत आहे.ही स्पर्धाप्रेक्षकांनाही सहभागी करुन घेईल. प्रेक्षक आपल्या आवडत्या प्राइम-टाइम कार्यक्रमांना पाहू शकतात, स्क्रीनवर दिसणाऱ्या सोप्या प्रश्नांची उत्तरे देऊ शकतात आणि रोजच्या बक्षिसांमध्ये एसयूव्हीकार, दुचाकी, सोन्याची नाणी, वॉशिंग मशीन, टीव्ही, मोबाईल फोन, मायक्रोवेव्ह, साड्या आणि आपल्या आवडत्या झी टीव्ही कलाकारांना भेटण्याची संधी जिंकू शकतात. या सणासुदीच्या उत्साहाचा विस्तार देशाच्या प्रत्येक कोपऱ्यापर्यंत करतया उपक्रमात 70 शहरांमध्ये मोठ्या प्रमाणावर ऑन-ग्राउंड मोहिमाही राबवली जात आहे. झी टीव्हीची टीम प्रेक्षकांशी प्रत्यक्ष भेट घेऊन संवाद साधत आहे, त्यांना स्पर्धेत सहभागी होण्यासाठी मार्गदर्शन करत आहे आणि त्यांना आकर्षक बक्षिसे जिंकण्याची संधी देत आहे. ‘अपनोत्सव’चा चेहरा असलेला प्रसिद्ध विनोदी कलाकार आणि अभिनेता सुनील ग्रोवर या मोहिमेला आपुलकी आणि जिव्हाळ्याचा स्पर्श देतो.

या मोहिमेच्या कथानकाततो आपल्या स्टारडमच्या झगमगाटापासून दूर जाऊन हरियाणातील आपल्या गावातील सोनू या भूमिकेत पुन्हा परततो.